म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा.वा.
दा. क्र. १८५८



मानवतेचे पुजारी

# इंदिरा प्रियदर्शिनी

BVBK-0401747
BVBK-0401747

रा. वा. शेवडेगुरुजी

वाचनालय
बा. बा.
१७४७
२२।१२।८४



BVBK-0401747

# इंदिरा प्रियदर्शिनी

इंदिराजींच्या जिद्दी जीवनाचे ओझरते गोष्टीरूप दर्शन

रा. वा. शेवडे गुरुजी

ऋणनिर्देश

अंजीश कर्माशियल आर्ट प्रिंटर्सचे चालक व कामगारवर्ग यांनी छपाई सुबक आणि वेळेत करून दिली.

मित्रवर्य अनंतराव ओगले यांनी योग्य दरात चांगल्या कागदाचा पुरवठा केला.

श्री. मधुकर ओतारी ' मयूर आर्टस् ' यांनी मुखपृष्ठ सुबक सजविले.

मराठे बंधू, बकरे बंधू आदींनी चांगले ब्लॉक्स बनवून दिले.

श्री महालक्ष्मी को–ऑप. बँकेने कॅश क्रेडिटची सुविधा कर्तव्यभावनेने उपलब्ध करून दिली.

या सर्व संबंधितांचे मनःपूर्वक आभार.

---

किंमत रुपये ६ फक्त

---

प्रकाशक : रामचंद्र वासुदेव शेवडे, ' शिवसंस्कार '
२२०५, डी, शुक्रवार, कोल्हापूर ४१६००२

मुद्रक : हरीश विनायक चौधरी, अंजीश कर्माशियल आर्ट प्रिंटर्स
६६९ ई, शाहूपुरी ३री गल्ली, कोल्हापूर – ४१६००१

© सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

आवृत्ती : १ ली : १९, नोव्हें. ८४

इंदिरा गांधी जयन्ती
' एकात्म दिन '

## मनोगत

### इंदिराजी !

घरातील वातावरणाचा परिणाम होऊन, बालपणीच आपण स्वदेशी कपडे वापरू लागलात. चाचाजींनी फ्रान्समधून आणलेला उंची फ्रॉक विदेशी कपड्यांच्या होळीत टाकलात.

सत्याग्रही सेनेमध्ये वय कमी भरल्यामुळे आपणाला भरती करून घेण्यात आले नाही. याचा विषाद मानून आपण वानरसेना उभारलीत आणि गुप्तपणे देशभक्तांचे संदेश एकमेकांकडे पोहोचते केलेत.

गुरुदेवांच्या शांतिनिकेतनात शालेय विषयांबरोबरच नृत्यकलेचा अभ्यास केलात व त्यात प्राविण्य दाखवून, विजयालक्ष्मी पंडितजींच्या अध्यक्षतेखाली बहारदार नृत्य करून आपण त्यांना आश्चर्याचा सुखद धक्का दिलात. कमलाजी अत्यवस्थ झाल्यामुळे शांतिनिकेतनातील आपला शिक्षणक्रम अर्धवट सोडून, त्यांच्या शुश्रुषेसाठी आपण युरोपात स्वित्झर्लंडला गेलात. कमलाजींच्या निधनामुळे आपण जणू पोरक्या झालात.

निश्चयाने आपण आपले शिक्षण इंग्लंडमध्ये चालू ठेवलेत. त्या काळी आपल्या एकाकी मनाला धीर देणाऱ्या फिरोजजींशी, ते परधर्मीय असूनही, उभय सनातन्यांचा तीव्र विरोध असतानाही, महात्माजींच्या मंगल आशीर्वादाने आपण निष्ठापूर्वक विवाहबद्ध झालात.

स्वातंत्र्यलढ्यात सक्रीय भाग घेऊन आपण मिरवणुकीत अग्रभागी राहिलात. लाठीमार सहन केलात. हातातील तिरंगा झेंडा पडू दिला नाहीत. पोलिस अधिकाऱ्याला आपण बाणेदारपणे उत्तरलात, ' मैं नेहरूजींकी कन्या हूँ । मैं डरूँगी नही । चिल्लाऊँगी नही । तिरंगा झंडा छोडूंगी नही । '

जवाहरलालजींवर हल्ला करण्यासाठी दडून बसलेला मारेकरी आपण दार उघडताच आपल्यावर चाल करून आला. पाप भित्रे असते हे ओळखून आपण धैर्याने त्याला बाजूला ढकललेत, प्रसंगावधान राखून त्याच्या हातातला सुरा काढून घेतलात.

जातीय दंगलीत एका मुसलमानाचे घर त्यांच्या कुटुंबियांसकट जाळून खाक करण्याचा प्रयत्न गुंड करीत असता तिथे आपण धीराने गेलात. त्यांचे घरच

काय, पण प्राणही वाचविलेत. क्रौर्यावर शौर्य कसे मात करते, याचा जणू वस्तुपाठच आपण दिलात.

जवाहरलालजींच्या दुःखद निधनानंतर शास्त्रीजींप्रमाणे आपलेही नाव नेतेपदासाठी पुढे आले. परंतु प्रत्यक्ष घटना जगलेल्या आणि आपणाला पित्यासमान वंदनीय असणाऱ्या शास्त्रीजींच्याच नावाचा आपण पुरस्कार केलात. शास्त्रीजींच्या आकस्मिक निधनानंतर नेतेपदी आपली निवड झाली आणि मग एकाहून एक कर्तबगारीची अचाट कामे करून आपण जगाला थक्क करून सोडलेत.

आपण 'सोनार बाँगला 'ला स्वातंत्र्य मिळवून दिलेत. बँकांचे राष्ट्रीयीकरण केलेत. वैज्ञानिक क्षेत्रात स्पृहणीय प्रगती केलीत. वीस कलमी कार्यक्रमाद्वारे दारिद्र्यरेषेखालील दीनदलित, हरिजन, गिरीजनादींचे जीवनमान उंचावलेत. आर्थिक दृष्ट्या भारत समर्थ बनविलात. आपल्या नेतृत्वाला, कर्तृत्वाला तोड नाही.

आपण नेहरू घराण्याच्या भाग्यलक्ष्मी ठराव्यात म्हणून आजीआजोबांनी आपले नाव इंदिरा ठेवले. मातापित्यांना प्रियदर्शिनी नाव प्रिय होते. कारण आपणास निसर्गाने अप्रतिम सौंदर्य बहाल केले होते. आनंदभवनातील जन-सामान्य 'प्रियदर्शिनी इंदिरा' असे संबोधत. पण –

आज मी आपणाला **इंदिरा प्रियदर्शिनी** म्हणून संबोधत आहे.

इंदिराजी, आपली निर्घृण हत्या झाली. आपल्या आयुष्यात अजोड कर्तृत्व करणाऱ्या आपल्या ओजस्वी आत्म्याच्या सौंदर्याने मी दिपून गेलो आहे.

इंदिराजी, आपण देशासाठी जगलात. देशासाठी हुतात्मा झालात. आपणा-सारख्याला नाहीसे करणे सोपे, पण दुसऱ्या इंदिराजी निर्माण करणे निय-तीलाही कठीण.

आपण गेलात, पण कीर्तिरूपाने अमर झाला आहात. आज आपले पुण्यस्मरण करून, कुमारांकरिता लिहिलेले हे आपले गोष्टीरूप जीवनदर्शन माझी व्यक्तिगत श्रद्धांजली म्हणून मी आपणास अर्पण करीत आहे.

१९, नोव्हे. ८४
इंदिरा गांधी जयंती
एकात्मदिन

**रा. वा. शेवडे गुरुजी**

म. ग्रं. सं. ठाणें, ग्रंथालय
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र 9648 दिनांक .......
विषय ............... क्र. 22/9/1952

१

# इंदिरा प्रियदर्शिनी

अत्यंत समाधानाने आणि विजयी मुद्रेने त्या दिवशी मोतीलालजी आपली कोर्टातली केस आटोपून आनंदभवनात परत आले होते. त्यांच्याबरोबर त्यांचेच एक सहाय्यक बॅरिस्टरही होते. आपल्या कामाच्या खोलीत खुंटीला कोट टांगता टांगता मोतीलालजी म्हणाले,

'विरुद्ध बाजूनं बराच पुरावा सादर केला होता, पण तो आमच्या क्रॉसपुढं टिकलाच नाही म्हणून आम्ही केस जिंकली.'

'या केसमध्ये तुमचं बुद्धिकौशल्यच पणाला लागलं.'

'नाही बाबा, नाही. खरं म्हणशील तर आमची तयारी एकोणपन्नास टक्के, तर नशीब एक्कावन्न टक्के होतं. नेहमीच माणसानं आपल्या बुद्धीची घमेंड बाळगू नये.'

'पण काही म्हणा मोतीलालजी, जेवढी केस कठीण तेवढी तुमची समयसूचकता, प्रसंगावधान आणि आव्हानप्रवृत्ती उफाळून वर येते. ती तुम्ही परवा जिंकलेली केस–'

'कुठली म्हणता ? अहो, मी केस कधी हरतच नाही.'

'ती इंग्लंडमधल्या विधवा बाईची, चोरीची. चार दिवस तो खटला चालला आणि तुम्ही तुमच्या अचाट बुद्धिमत्तेनं शेवटच्या अवघ्या तीन मिनिटांत त्याला कलाटणीच देऊन जिंकलात.'

मोतीलालजींचे दिल्लीचे व्याही कौलजी त्या क्षणी तिथे उपस्थित झाले नसते तर या दोन वकिलांची बोलणी किती वेळ

चालली असती कुणाला ठाऊक ?

कौलजींना पाहून मोतीलालजी म्हणाले,

'बोला कौलजी, कमलाला भेटायला आलात वाटतं ? तिची तब्बेत उत्तम आहे बरं !'

'सातवा महिना पुरा होत आला आहे. म्हटलं आता तिला घेऊन जावं.'

'कमलाचं पहिलं बाळंतपण रूढीनुसार तिच्या माहेरी व्हायला पाहिजे, हे तुमचं म्हणणं मला मान्य. परंतु याबाबत आपण कमलाच्या सासूबाईंचा विचार घेऊ या.'

इतक्यात स्वरूपाराणी चहा-फराळाचं घेऊन तिथं आल्या. चहा घेता घेता मोतीलालजी स्वरूपाराणींना म्हणाले,

'ऐकलंत का ?'

'काय ऐकायचंय ?'

'अहो, हे व्याही तुमच्या सूनबाईंना बाळंतपणाकरिता माहेरी दिल्लीला न्यायला आलेत.'

'त्यात त्यांचं काही गैर नाही. पण–'

'पण काय म्हणता भाभी ?' कौलजींनी पृच्छा केली.

'कमलासह आम्हा सर्वांचा नुकताच विचार झाला की, तिचं बाळंतपण आमच्या इथं आनंदभवनातच करायचं. आमच्याकडं नामांकित डॉक्टरांची येजा असते, तुम्हांला माहीतच आहे.'

'शिवाय कमलाच्या बाळंतपणाकरिता काही खास डॉक्टरांची आम्ही व्यवस्था करू.' मोतीलालजींनी दिलासा दिला.

कौलजींना नाही म्हणणे शक्यच नव्हते. मात्र ते जरा खट्टू झालेले दिसले. मोतीलालजींनी कौलजींची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

'कौलजी, तुम्ही व्यापारात चोवीस तास मग्न असता. असं करा, शेवटी एक महिनाभर तुमच्या पत्नींना द्या ना आनंदभवनातच पाठवून. म्हणजे कमलाला माहेरी असल्यासारखंच वाटेल.'

या खुलाशाने कौलजींना बरे वाटले. कारण मोतीलालजींनी ही सूचना केली नसती तर कमलाजींच्या मातोश्रींना पाठविण्याचा त्यांना संकोच वाटला असता.

शेवटच्या दोन महिन्यांत कमलाजींच्या सर्व हौशी भागविल्या गेल्या. शारीरिक आणि मानसिक कुठल्याही प्रकारची तोशिस त्यांना पडू देण्यात आली नाही.'

खास एका स्कॉटिश डॉक्टरीणबाईंच्या मार्गदर्शनाखाली कमलाजींचे यशस्वी बाळंतपण झाले. पहिले बाळंतपण म्हणून जो काही त्रास स्त्रीला अपरिहार्यपणे होतो तेवढाच झाला.

कमलाजी प्रसूत झाल्या. डॉक्टरीणबाई म्हणाल्या,

'मुलगी झाली मुलगी. मिठाई वाटा.'

त्या दिवशी आनंदभवनात आनंदीआनंद पसरला. रोषणाई करण्यात आली. मुलीचे रंग, रूप, बाळसे पाहून आणि बाळबाळंतिणींना कसला त्रास झाला नाही हे ऐकून मोतीलालजींचा जीव भांड्यात पडला. तसे म्हटले तर मुलगी झाल्याची नाराजी कमलाजींच्या सासूबाई स्वरूपाराणींच्या चेहऱ्यावर दिसून आली. त्या मोतीलालजींना म्हणाल्या,

'कन्या झाली हे तर चांगलंच. पण जवाहरला पहिला मुलगा झाला असता तर मला अधिक बरं वाटलं असतं.'

'अहो, एवढं आता तुमचं वय झालं. काळ पालटला आहे आणि तुम्ही मुलगा–मुलगी असा भेद करता ? अहो, असेलच नशिबात तर ही मुलगी हजार मुलांना जे करून दाखविता येणार

नाही, तेवढं कर्तृत्व करून दाखवील. मुलगा मुलगा काय करताय ?'

'जाऊ द्या. आम्हांला आवडो न आवडो. निसर्गात का आम्ही बदल करणार आहोत. गोड मानून घेतलंच पाहिजे. पण नातीचं नाव काय ठेवणार सांगा ना ?'

'त्याचा विचार मी केलाय. गेले दोन महिने तो माझ्या डोक्यात घोळतोय.'

'कोणतं नाव सुचलंय तुम्हांला ?'

'इंदिरा, तुमच्या सासूबाईंचं.'

'अग बाई, काय त्या करारी, कडक शिस्तीच्या आणि वक्तशीरपणाच्या होत्या ! अहो, पण हे जुनं नाव आवडेल का जवाहरला आणि कमलाला. लेक त्यांची आहे. त्यांचा सल्ला घेतलेला बरा.'

नावाचा विचार जवाहरलालजी आणि कमलाजी यांच्यापुढे आला. मोतीलालजींनी मनामध्ये इंदिरा हे नाव निश्चित केले होते तसे जवाहरलालजींनी प्रियदर्शिनी हे काव्यमय नाव पक्के केले होते.

मोतीलालजींनी विचारले,

'बेटा, तुझ्या पोरीचं काय नाव ठेवायचं ठरवलंयस ?'

'पिताजी, पोर गोरीगोरीपान आहे, नाकेली आहे, मोठ्या कपाळाची आहे, पाणीदार डोळ्यांची आहे आणि बाळसं तर कसं छान आलंय.'

'वेडंचा, तुझ्या पोरीचं काव्यमय वर्णन मी विचारलं नाही. नावाचं काय ते बोल.'

'म्हणजे माझ्या मते प्रियदर्शिनी हेच नाव योग्य. कमलाला सुद्धा हेच नाव आवडलं आहे.'

मुलीचे नाव ठेवण्याच्याबाबतीत उघड उघड दोन पक्ष पडले. मोतीलालजींनी इंदिरा नावाचा आग्रह धरला आणि जवाहरलालजींचा नाईलाज झाला. जवाहरने खट्टू होऊ नये म्हणून त्याची समजूत काढण्याच्या दृष्टीने मोतीलालजी म्हणाले,

'बेटा, हे बघ. इंदिरा नावानं तुझी आजी नेहरू घराण्यात आली आणि ती भाग्यलक्ष्मी ठरली. तिचं घरात पाऊल पडताच लक्ष्मीबरोबर सरस्वती या नेहरू घराण्यात पाणी भरू लागली. म्हणून ही तुझी मुलगी तशीच होऊ द्या भाग्यलक्ष्मी आणि आपल्या कर्तबगारीनं आपल्या घराण्याचं नाव उज्ज्वल करू द्या. मला तर बालंबाल खात्री वाटते, तसं का वाटतं याचं कारण मी देऊ शकणार नाही, पण जे हजार मुलांना करून दाखविता येणार नाही, ते कदाचित ही तुझी मुलगी करून दाखवील.'

थाटामाटात बारसे घालून नाव इंदिरा ठेवण्यात आले. मात्र जवाहरलालजी इंदिराला प्रियदर्शिनीच म्हणू लागले. आनंदभवनातील जनसामान्यांनी दोन्ही धन्यांना खुष करण्यासाठी 'प्रियदर्शिनी इंदिरा' असे संबोधण्यात सुरुवात केली.

ते काहीही असो. पण इंदिराजींचे जीवन पाहिल्यानंतर मोतीलालजींची अमृतमयी भविष्यवाणी खरी ठरली, यात शंकाच नाही.

——

**उजळणीचे प्रश्न**

१) मोतीलालजी आणि त्यांचे सहाय्यक बॅरिस्टर यांच्यात काय बोलणे झाले ? २) कौलजी मोतीलालजींकडे का आले होते ? ३) कमलाजींचे बाळंतपण सासरीच का झाले ? ४) कमलाजींनी कन्या झाल्याचे ऐकून स्वरूपाराणींना का वाईट वाटले ? ५) मुलीचे नाव इंदिरा का ठेवले गेले ? ६) जवाहरलालजींच्या मनात कोणते नाव ठेवावयाचे होते ? ते का ?

# २

# जला दो जला दो!

आनंदभवनामध्ये एकदा मोतीलालजींना विलायतेहून नुकत्याच परत आलेल्या त्यांच्या नातेवाईकाचा भेटायला येत असल्याचा निरोप आला. आपल्या बैठकीच्या हॉलमध्ये मोतीलालजी पाहुण्यांची वाट पाहत बसले. मधून मधून त्यांची लाडकी नात-इंदिरा -आपल्या पापूंच्या कपाटातील रंगीत पुस्तक घेऊन चित्राचा अर्थ आपल्या दादाजींना विचारून जात होती.

थोड्या वेळाने ते पाहुणे उपस्थित झाले. त्यांनी मोतीलालजींना आदरपूर्वक नमस्कार केला. मोतीलालजी म्हणाले,

'बोला बाबूजी, कशी काय झाली तुमची विलायतची वारी?'

'फारच छान! हवामान अनुकूल होतं. विशेषत: फ्रान्समध्ये आमचे मुक्कामाचे चार दिवस फारच मजेत गेले.'

'ते कसं काय?'

'काहीही म्हणा. आनंदानं आणि रंगेलपणानं जीवन जगावं तर ते फ्रेंचांनीच. आम्ही हिंदी माणसं म्हणजे शुष्क, तत्त्वचिंतक, आनंद लुटण्यात कंजूषपणा दाखविणारी आणि दु:खात सुद्धा कुणी पोटभर रडूही देत नाहीत.'

इतक्यात त्यांच्या खोलीत इंदिरा आली. तिच्याकडे पाहून बाबूजी म्हणाले,

'इंदूबिटिया थोडी उंच झालेली दिसते नाही? आणि दिसते सुद्धा छान! इंदूबेटी, इकडं ये.'

बाबूजींनी हाक मारताच इंदिरा त्यांच्यापुढे जाऊन उभी राहिली. बाबूजी म्हणाले,

'बिटिया, तुझ्यासाठी मी काय आणलंय ओळख ?'

'तुम्ही बाजारातून आणलंय काय ?'

'हो हो, इथल्या नव्हे, फ्रान्सच्या.'

'मग काय आणलंय ते सुंदरच आणणार !'

'पण ओळख ना ?'

इंदिराने दोन-चार खेळण्यांची नावे घेतली. तेव्हा बाबूजींनी नाही म्हटले.

आपल्या बॅगमधून फ्रान्समधून त्यांनी इंदूबिटियासाठी आणलेला तलम, गुलाबी, उंची फ्रॉक बाहेर काढून ते म्हणाले,

'आमच्या इंदू बिटियाला हा फ्रॉक नक्कीच आवडणार.'

इंदिराने तो फ्रॉक घेतला आणि आपल्या माँजींना दाखविण्यासाठी अधीरतेने ती आत त्यांच्याकडे गेली. माँजी म्हणाल्या,

'इंदू, अंगात घाल आणि चाचाजींना जाऊन नमस्कार कर.'

इंदिरा आपल्या खोलीत गेली. तिच्या खोलीतले तिचे कपडे सगळे साधे आणि देशी होते. त्यावेळी रस्त्यारस्त्याला विदेशी कपड्यांच्या होळ्या होत होत्या. नेहरू कुटुंबातल्या प्रत्येक व्यक्तीने आपले उंची विदेशी कपडे प्रखर देशभक्तीचे प्रतीक म्हणून होळीत टाकले होते. आपल्या साध्या कपड्यांच्या तुलनेत तिला तो गुलाबी फ्रॉक आकर्षक वाटला. पण तो विदेशी असल्यामुळे तितकाच तिरस्करणीय वाटला.

नवा फ्रॉक घालून इंदिरा अद्याप का आली नाही म्हणून कमलाजी तिच्या खोलीत गेल्या. फ्रॉक एका कोपऱ्यात फेकला गेला होता आणि आपल्या खुर्चीवर बसून इंदिरा त्याकडे टक

लावून पाहत होती. कमलाजी म्हणाल्या,

'अजून नाही फ्रॉक घातलास ?'

'नाही, मी तो फ्रॉक घालणार नाही. कारण तो परदेशी आहे.'

कमलाजींना इंदिरेचा राग आला. तिचे म्हणणे त्यांना पटले होते. पण त्याहूनही मोठ्या प्रेमाने तो आणून देणाऱ्या पाहुण्यांचा नकळत अपमान होत आहे असे त्यांना वाटले. किंचितशा रागात कमलाजी म्हणाल्या,

'इंदू, तो काही आम्ही शिवलेला नाही. तो दुसऱ्यांनी भेट म्हणून दिलाय. भेट देणाऱ्याला अशानं वाईट नाही का वाटणार ? नाही तरी त्या विदेशी खेळण्यांबरोबर दोन दोन तास खेळत बसतेसच की ?'

कमलाजींनी थोडेसे चापले तरी इंदिरा काही फ्रॉक घालण्यासाठी उठली नाही. कमलाजींनी तिचा नाद सोडून दिला आणि त्या आपल्या कामाला निघून गेल्या.

इंदिरा फ्रॉक घालून आता येईल, मग येईल अशी तिची थोडी वाट पाहुण्यांनी पाहिली आणि पुन्हा त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. तासाभराने बाबूजी निघून गेले. दरवाज्यापर्यंत मोतीलालजी त्यांना पोहोचवायला गेले. नमस्कार करून ते परत फिरल्यावर त्यांच्या मनात विचार आला की, नवा फ्रॉक घालून इंदिरा का आली नाही; म्हणून ते तिच्या खोलीत गेले. इंदिरा आपल्या खोलीत नव्हती. त्यांनी मोठ्याने इंदू म्हणून हाक मारली. बाहेरच्या दरवाज्याशेजारच्या एका झाडाखालून 'आले दादाजी' म्हणून उत्तर आले. त्या आवाजाच्या अनुरोधाने मोतीलालजी आनंदभवनाच्या दरवाज्याजवळ गेले. त्यांनी डावीकडे पाहिले. इंदू दिसली नाही म्हणून उजवीकडे पाहिले तो त्यांना एक मोठे

विचित्र दृश्य दिसले. त्यांनी इंदिरेला विचारले,

'इंदू, काय चाललंय ?

'दादाजी, तुम्ही आणलेली सगळी खेळणी मोडून तोडून टाकते आहे.'

'पण वेडे, हे कशासाठी ?'

'ती परदेशी नाहीत का ?'

'अग, पण त्यासाठी मी पैसे दिलेत.'

'पापूंनी आपले विदेशी कपडे रस्त्यावरच्या होळीत जाळले. माँजींनी आणि आत्याजींनी आपल्या परदेशी साड्या जाळल्या. त्यांना पैसे पडले नव्हते का ?'

मोतीलालजी निरुत्तर झाले. आपली छोटी देशभक्त इंदू गुलाबी विदेशी फ्रॉक का नेसून आली नाही याचे कोडे त्यांना उलगडले. ते आनंदाने आणि तितक्याच अधीरतेने उद्गारले,

'म्हणून तो गुलाबी फ्रॉक तू नेसली नाहीस का ?'

'नाव नका घेऊ त्या फ्रॉकचं ! आता रस्त्यावर परदेशी कपड्यांची लोकांनी होळी केली किनई म्हणजे सगळ्यात आधी जाऊन मी तो पूर्ण जळून जाईपर्यंत त्याकडं बघत उभी राहणार.'

मोतीलालजींनी प्रेमभराने आपल्या लाडक्या इंदूला उचलून घेतले. तिची पाठ थोपटली आणि तिला घरात नेत थट्टेच्या सुरात म्हणाले,

'इंदिरा नेहरू की जय !'

इंदिरेने फ्रॉक न घालण्याचे कारण आणि तो जाळून टाकण्याचा निर्णय मोतीलालजींनी घरात सर्वांना सांगितला. सर्वांना कौतुक वाटले. तिच्या पापूंना तर धन्यताच वाटली.

—

### उजळणीचे प्रश्न

१) मोतीलालजींच्या पाहुण्यांनी छोटचा इंदिरेसाठी भेट म्हणून काय आणले होते ? २) छोटचा इंदिरेने तो फ्रॉक का घातला नाही ? ३) म्हणून कमलाजी छोटचा इंदिरेस काय म्हणाल्या ? ४) कमलाजींच्या बोलण्याचा परिणाम छोटचा इंदिरेवर काय झाला ? ५) 'इंदिरा नेहरू की जय' असे मोतीलालजी कौतुकाने का म्हणाले ?

# ३

# वानरसेना ! छे, बाल गुप्तचरचमू

अलाहाबादेतील आनंदभवनासमोरून 'भारत माता की जय,' 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणा देत एक मिरवणूक चालली होती. ती घोषणा आनंदभवनातील छोटचा इंदूच्या कानांवर पडली. खेळण्यातील निर्जीव सैनिकांवरून तिचे लक्ष उडाले. तिने आयाकडे पाहिले. आयाची डुलकी लागली होती. संधी साधून इंदू फाटकाजवळ आली आणि आपणही घोषणा देत मिरवणुकीत सामील झाली. घोषणांच्या वाढत्या निनादाने आयाची डुलकी उडाली. पाहते तो छोटी इंदू तिला दिसेना. आया घाबरून बाहेर आली. तिने पाहिले. इंदू मिरवणुकीत सामील झाली होती. आयाने धावत जाऊन इंदूला पकडून आणले आणि फाटक बंद करून घेतले.

पारतंत्र्यातील काळ. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य-

चळवळीला बहर आला होता. जवाहरलालजीच नव्हे तर मोतीलालजींनीही चळवळीत भाग घेतला होता. त्यांना अटक झाली होती. आनंदभवनातील अन्य सर्व प्रौढ मंडळी पिकेटिंगला जात. तेव्हा घरात दहा बारा वर्षांची इंदू आणि तिची आया असे. इंदूने अशा मिरवणुकांमागून मिरवणुका निघालेल्या पाहिल्या. एकदा संधी साधून तिने धाडस केलें. ती स्वातंत्र्यसैनिकांच्या दलात भरती होण्यासाठी कचेरीवर गेली. त्या सेनानीने विचारले,

'मुली, तुझं वय काय ?'

'बाबा, बारावं लागलंय.'

'अठरा वर्षे पुरी झाल्याशिवाय तुला भरती होता येणार नाही. रागावू नकोस.'

'ठीक आहे.' इंदू काहीशा घुश्श्यातच म्हणाली. 'सहा वर्षांनी नक्की भरतीसाठी इथं आल्याशिवाय राहणार नाही.'

इंदू बोलून गेली. पण घरी आल्यावर सहा वर्षांचा काळ म्हणजे विलक्षण मोठा काळ असे तिला वाटले. आपण काही तरी आपल्या देशासाठी या वयात नक्की केले पाहिजे, या विचाराने तिचे बालमन व्यापून गेले.

गुलामीतल्या दुःखाच्या अनेक गोष्टी तिने आपल्या पापूंच्याकडून – जवाहरलालजींकडून – ऐकल्या होत्या.

इंदू प्रेमाने आपल्या वडिलांना पापू म्हणे. पापूंच्या ग्रंथांतील चित्रांची मौलिक पुस्तके पाहून चित्रांचा अर्थ विचारणे हा तिचा प्रमुख छंद होता. पापूंनी आपल्या प्रियदर्शिनीला कधी नाराज केले नाही. सर्व सर्व प्रश्नांची उत्तरे ते देत.

इंदूने गल्लीतली छोटी छोटी मुले गोळा करून त्याना सैनिक केले. ती सेनापती झाली. ती मुलांना गोष्टी सांगू लागली.

सुरुवातीला मुले गोंधळ करीत, इंदूचे ऐकूनच घेत नसत. पण इंदू तशी डरणारी नव्हती. तिने थोड्या थोड्या अंतराने दोनतीन रांगेत त्या मुलांना बसविले आणि आपण त्यांना देशभक्तीच्या गोष्टी सांगू लागली. मुलांना तिच्या गोष्टी आवडत. बाळसेनेचे आपल्या सेनापतीवर प्रेमच नव्हे तर भक्ती जडली.

आपल्या सेनेला काही तरी नाव दिले पाहिजे म्हणून इंदूचे अमाप कौतुक करणाऱ्या आपल्या आईला – कमलाजींना – तिने विचारले,

'माँजी, काही तरी नाव सुचवा ना !'

'कसलं नाव, बेटा ?'

'आमची मुलांची सेना आहे ना ? त्याला.'

'मग त्यात काय कठोण आहे ? नाव अगदी सोपं.'

'ते कोणतं ?'

'वानरसेना.'

वानरसेना हे नाव कानांवर पडताच इंदू खूप चिडली. ती रागातच आपल्या माताजींना म्हणाली,

'माँजी, निदान तुम्ही तरी माझी थट्टा करायला नको होती.'

'इंदूबिटिया, मी तुझी थट्टा नाही केली. अग, तुला रामायण माहीत नाही का ? त्या रामानं राक्षसांवर विजय मिळविला तो वानरसेनेच्या मदतीवर. हनुमंत, सुग्रीव, अंगद हे वानरच होते. ते भक्तिवान होते, शक्तिवान होते, बुद्धिवान होते.'

माताजींचा खुलासा ऐकल्यावर इंदू एकदम खूष झाली आणि माताजींच्या गळ्यात मिठी मारून म्हणाली,

'माँजी, क्षमा करा हं मी रागावल्याबद्दल.' वानरसेना नाव निश्चित झाले.

देशभक्तांच्या नुसत्या गोष्टी सांगण्याच्या कार्यक्रमाने वानर-सेनेच्या सेनानीला– इंदूला – समाधान वाटेना. आनंदभवनात येणाऱ्या राजाजी, वल्लभभाई यांसारख्या अनेक देशभक्त पाहुण्यांशी तिने विचारविनिमय केला. एकाने सुचविले, 'एका पुढाऱ्याचा निरोप दुसऱ्या पुढाऱ्याला न चुकता पोहोचविण्याची कामगिरी जर तुम्ही केलीत तर मोठीच सेवा होईल.'

'ती कशी ?' इंदूने शंका विचारली.

'पुष्कळ वेळेला मोठ्या माणसांचा पोलिसांना संशय येतो. मग निरोप कळवणं कठीण होतं. मुलांची कुणाला शंका येत नाही.'

'हे काम आम्ही जरूर करू.'

'पण इंदूबाळ, त्यात एक मोठी अडचण आहे.'

'ती कोणती ?'

'अचूक निरोप पोहोचविणं मुलांना कठीण पडतं. गणपतीचा मारुती केव्हा होईल नेम नसतो.'

'ती शंका सोडा. मी सेनानी असल्यावर चूक शक्यच नाही.'

इंदूची वानरसेना तत्काल बाल गुप्तचरचमू बनली. मुले निरोप आणीत, इंदू तो घोकून घेई, सावधानतेचा इशारा देई आणि स्वतःची खात्री झाल्यावरच पाठवी.

इंदिराजींच्या बालपणीच्या या वानरसेनेतील, छे ! बाल गुप्त-चरचमूतील एकाही सैनिकाने कधी कसली चूक केली नाही. ही वानरसेना त्या काळी बेडन पॉवेल यांच्या बोअर युद्धातील बाल-वीर सेनेप्रमाणे गुप्तचर चमूच्या स्वरूपात उपयुक्त ठरली, गाजली.

गवयाचे पोर सुरात रडते. पोराचे पाय पाळण्यात दिसतात, या उक्तीप्रमाणे भारतरत्न इंदिरा गांधींचे बालपणही स्वदेश-

भावनेने भरून गेले होते.

--

### उजळणीचे प्रश्न

१) खेळण्यातून छोटचा इंदिरेचे लक्ष का उडाले? तिने काय केले? २) सत्याग्रही म्हणून ती कुठे गेली होती? तिची नोंदणी का झाली नाही? ३) मग छोटचा इंदिरेने काय करायचे ठरविले? ४) तिच्या बालचमूला कमलाजींनी कोणते नाव सुचविले? ५) ते नाव छोटचा इंदिरेला का आवडले नाही? ६) कमलाजींनी त्या नावावर कोणता खुलासा केला? ७) या बालचमूने कोणकोणते उपक्रम केले?

म. गं. ... वाचनालय ...
क्र. १६८६ दिनांक 22/12/58
विषय

४

# आई कुणा म्हणू मी!

---

शांतिनिकेतनच्या आवारातील एका वटवृक्षाखालच्या प्रशस्त पारावर बसून गुरुदेव टागोर निसर्गचित्र रेखाटीत होते. वरचेवर त्यांना समोरच्या दृश्याकडे पाहावे लागे आणि मग आपल्या कुंचल्यानं ते, ते साकार करीत.

निसर्ग प्रसन्न असल्यामुळे आज देखावा चितारताना गुरुदेव खुषीत होते. एखादी कविता रचताना त्यांची लेखणी जशी सरसर चाले तसा त्यांचा कुंचला काम देत होता. त्यांनी समोर पाहिले. वृक्षराजीपलिकडील निळ्या आकाशात दोन ढग आलेले

त्यांना दिसले. ते ढग दूर होतील नी पहिले दृश्य पुन्हा दिसेल अशी त्यांची अपेक्षा होती. ढग दूर होण्यास थोडा अवधी होता म्हणून त्यांनी डाव्या बाजूच्या झुडुपाकडे पाहिले. झुडुपाआड एक कॉलेजकुमारिका उभी असलेली त्यांना दिसली. गुरुदेवांच्या मनात कुतूहल निर्माण झाले. काही शंका तिला विचारावयाची असावी आणि आपण चित्र काढीत असल्यामुळे ती थवकली असावी आणि देखाव्याच्या आड आपण येऊ म्हणून ती झुडुपाआड लपली असावी असे त्यांना वाटले.

गुरुदेवांनी त्या कॉलेज कुमारीकडे पाहत विचारले,

'कोण आहे ?'

'मी इंदिरा नेहरू.' संकोचून पुढे येऊन इंदिराजी उत्तरल्या.

'इंदूबेटी, तुला काय हवंय ?'

'काहीच नको.'

'मग असं काम सोडून उभी का राहिलीस ?'

'माझ्या वाटणीचं सारं काम मी पूर्ण केलं आहे.'

'मग इथं कशाला आलीस ?'

'किती एकचित्तानं आमचे गुरुदेव चित्र चितारतात ते पाहायला.'

'अस्सं ?' गुरुदेव कौतुकाने म्हणाले. 'इंदू, मग ये इकडं नी बैस अशी या पाराच्या दगडावर. म्हणजे निसर्गाचा देखावा आणि माझं चित्र तुला दिसेल.'

थोड्या वेळाने गुरुदेवांचे चित्र रेखाटणे संपले. त्यांनी इंदिराजींकडे पाहत विचारले,

'इंदू, आवडते तुला चित्रकला ? '

'हो. चित्रकलाच काय, संगीत आणि नृत्यकलासुद्धा मला

आवडतात. माझ्या लहानपणी आनंदभवनात एक शिक्षक मला नृत्य शिकवीत होते.'

'मग फारच छान. कथ्थक की मणिपुरी ?'

'मणिपुरी.'

'आमच्या इथं रोज नृत्याचा वर्ग भरत असतो. तू रोज त्या वर्गाला जा एक तासभर. तुझ्या अन्य कामातलं तासाभराचं काम कमी करण्याची मी व्यवस्था करतो.'

'छे छे गुरुदेव ! मी माझी सारी कामं करून नृत्य शिकायला जाईन.'

'ठीक आहे. पण समज तुला कामाचा बोजा वाटला तर जरूर मला सांग.'

इंदिराजी हसत उत्तरल्या,

'तशी पाळीच यायची नाही, गुरुदेव.'

'अग, श्रीमंताघरची लेक तू. तुझ्या आजोबांचं वैभव माझ्या कानी आलं आहे. तुला कुठली कष्ट करण्याची सवय असणार ?'

'गुरुदेव, तुम्हांला ते महात्माजी ठाऊक आहेत ना ?'

'साऱ्या जगाला जे माहीत आहेत, ते मला माहीत नसतील का ?'

'त्यांच्या साबरमतीला मी एकदा गेले होते. सगळी मुलं खादी वापरीत. मीही वापरायला सुरुवात केली. ती अजूनही वापरते बरं का ! तिथं मी पहाटे चार वाजता उठत असे. थंड पाण्यानं आंघोळ करीत असे. गटागटाच्या वाट्याला जी जी कामे येत ती सगळी मी व्यवस्थित करीत असे. अहो, महात्माजी सवलत द्यायला तयार होते. पण ती स्विकारणे मला अपमानास्पद वाटलं.'

'अगदी बरोबर. मग तू आमच्याकडून कसलीच सवलत घेणार नाहीस तर. इंदू, ही तुझी जिद्द, चिकाटी, कष्टशीलता तू जर वाढवशील तर तू फार मोठी होशील.'

लगेच दुसऱ्या दिवसापासून इंदिराजींचा नृत्याचा वर्ग सुरू झाला. इतर सर्व विषयांत आणि सर्व परीक्षांत त्या उत्तम रीतीने उत्तीर्ण होत होत्या. नृत्यातही त्यांनी विशेष कौशल्य संपादन केले.

इंदिराजींना वाटले की, आपले हे कौशल्य एकदा गुरुदेवांनी पाहावे. पण गुरुदेव आपल्या कामाच्या व्यापात इतके गुरफटून गेलेले असायचे की, त्यांना कसे विचारायचे याचे इंदिराजींनाच काय, पण त्यांच्या नृत्यवर्गाचे शिक्षक नंदकुमार यांनाही धाडस झाले नाही.

पण इंदिराजी जिद्दीच्या होत्या. त्यांनी एके दिवशी ते धाडस केले. गुरुदेवांना त्यांचे नृत्य आवडले. ते खूप झाले. ते इंदिराजींना म्हणाले,

'इंदू बेटी, तुझी नृत्याची तयारी पाहून मी खूष झालो आहे. आजच तुझ्या वडिलांना मी माझा आनंद आणि तुझं कौशल्य पत्राने कळवितो. जेव्हा आमच्या संस्थेसाठी काही रंजनकार्यक्रम करावे लागतील, तेव्हा तुझा आम्हाला फार फार उपयोग होईल.'

– आणि तसेच झाले.

त्या वर्षीचा जमाखर्चाचा आढावा व्यवस्थापकांनी गुरुदेवांपुढे ठेवला व दीडएक लाख मिळविल्याशिवाय खर्चाची तोंडमिळवणी होणार नाही, असे सांगितले आणि गुरुदेवांनी शांतिनिकेतनचे कलापथक शांतिनिकेतनच्या मदतीकरिता भारतभराच्या प्रमुख शहरातून खास स्वतःच्या मार्गदर्शनाखाली

फिरविण्याचे ठरविले.

ही बातमी जेव्हा इंदिराजींना लागली, त्यावेळी त्यांना या कलापथकातून आपल्याला भारत देश पाहायला मिळणार आणि आपल्या नृत्यकलेचा आविष्कार भारतीयांपुढे सादर करण्याची सुसंधी प्राप्त होणार म्हणून अतिशय आनंद झाला.

परंतु नियतीची चाल मोठी विचित्र असते. तिचा अंदाज कुणाला करता येत नाही.

इंदिराजींचे तसेच झाले.

एके दिवशी संध्याकाळी शांतिनिकेतनात इंदिराजींना तार आली, 'कमलाजी अत्यवस्थ आहेत. तावडतोब निघा.'

मोठ्या दु:खी मनाने इंदिराजींनी गुरुदेवांचा आणि त्यांच्या शांतिनिकेतनाचा निरोप घेतला.

त्या तावडतोब अलाहाबादला आल्या. कमलाजींच्या प्रकृतीवर भारतात उपचार करून काही गुण आला नाही म्हणून त्यांना जर्मनीला न्यायचे ठरविले. त्याप्रमाणे इंदिराजी आपल्या मातोश्रींबरोबर जर्मनीला गेल्या. स्वातंत्र्याच्या चळवळीत जवाहरलालजींना अटक झाली होती. जर्मनीतल्या डॉक्टरांनी कमलाजींच्यावर उपचार सुरू केले. त्यांना औषधे दिली आणि हवापालट म्हणून स्वित्झर्लंडला नेण्यास सुचविले. पण तोपर्यंत कमलाजींच्या परिचयाचा एक उमदा, होतकरू, सेवाभावी तरुण फिरोज गांधी इंग्लंडमध्ये शिकत होता, तो आपल्या कमला-आँटीची बिघडलेली प्रकृती पाहून जर्मनीला आला आणि इंदिराजीं-बरोबर स्वित्झर्लंडमध्ये कमलाजींची सेवासुश्रुषा करण्यात इंदिराजींना मौलिक मदत करू लागला. परंतु औषधोपचाराचा आणि या सेवासुश्रुषेचा कमलाजींच्यावर काहीच परिणाम झाला

नाही. उत्तरोत्तर त्यांची प्रकृती विघडतच गेली. जवाहरलालजींना तावडतोब कळविण्यात आले. सरकारने जवाहरलालजींची बिनशर्त सुटका केली. जवाहरलालजी स्वित्झर्लंडला आले. कमलाजींना तेवढेच बरे वाटले. आपले पापू आले आहेत, तेव्हा माँजींची प्रकृती निश्चित सुधारणार, अशी आशेविरुद्ध आशा इंदिराजींना वाटली.

अखेर थोड्याच दिवसांत दुष्ट नियतीने आपला क्रूर कावा साधला. कमलाजी या दुनियेतून निघून गेल्या.

इंदिराजी शोकसागरात बुडाल्या. पण त्या वीरकन्या होत्या. त्यांनी स्वतःला सावरले.

जवाहरलालजी सतत देशकार्यात आणि वरचेवर तुरुंगातच जात असल्यामुळे इंदिराजींचा ममतामयी मातेचा एकमेव आधार अशा तऱ्हेने तुटला. त्या निराधार झाल्या.

जवाहरलालजींनी आपल्या प्रियदर्शिनीला परत भारतात शांतिनिकेतनात घालण्याचे ठरविले. ही कल्पना त्यांनी त्यांच्या कुटुंबियांशी चिरपरिचित असलेल्या फिरोजजींना सांगितली. फिरोजजी म्हणाले,

'चाचाजी, एक सुचवू का?'

'काय सुचवायचंय तुला, फिरोज?'

'इंदिराजींचं नाव ऑक्सफर्डमध्ये दाखल करा. मी इथं आहेच. भारतात चळवळीमुळे अस्वस्थ वातावरण निर्माण झाले आहे. तिथं इंदिराजींचा एकचित्तपणे अभ्यास होणार नाही.'

जवाहलालजींनी फिरोजजींची सूचना ऐकून घेतली. पण प्रथम इंदिराजींना घेऊन भारतात परतणे त्यांना आवश्यक होते. म्हणून ते आले.

थोडे स्थैर्य प्राप्त होताच इंदिराजींच्या पुढील शिक्षणासंबंधी आपल्या भगिनींशी त्यांनी विचारविनिमय केला. भारतातील स्वातंत्र्याची चळवळ दिवसेदिवस उग्र स्वरूप धारण करीत होती, म्हणून इंदिराजींना जवाहरलालजींनी इंग्लंडला पाठवून दिले.

—

**उजळणीचे प्रश्न**

१) शांतिनिकेतनमधील झुडुपाआडून विद्यार्थिनी इंदिराजी काय पाहत होत्या ? २) गुरुदेवांनी त्यांना काय सुचविले ? ते का ? ३) इंदिराजींना शांतिनिकेतन का सोडावे लागले ? ४) सोडताना त्यांना वाईट का वाटले ? ५) तेथून त्या कुठे गेल्या ? ६) स्विन्झर्लंडमध्ये इंदिराजींवर कोणती मोठी आपत्ती आली ? ७) त्यांच्या दुःखात सहभागी कोण झाले होते ? ते कसे ?

५

# शुभमंगल सावधान

कमलाजींच्या मृत्यूचे इंदिराजींना विलक्षण दुःख झाले. त्यांच्यावर अपार माया करणारे एकमेव माणूस कमलाजी आणि त्यांनाही काळाने हिरावून नेले. इंदिराजींना आपल्या या दुर्दैवाची थोडी चीडही आली. जवाहरलालजींचे इंदिराजींवर प्रेम असले तरी मातेचे प्रेम आणि पित्याचे प्रेम यात नाही म्हटले तरी

अंतर पडतेच. मातेच्या मायेच्या उबीचे सुख काही औरच असते. तिची सर कशालाच येणार नाही. आपली प्रियदर्शिनी पोरकी झाली आहे. पण तिला तसे वाटू द्यायचे नाही, असे जवाहरलालजींनी ठरविले.

परंतु तो काळ एवढ्या धामधुमीचा होता की, परिस्थिती केव्हा व कसे स्फोटक वळण घेईल याचा नेम नव्हता. मोतीलालजींनी विजयालक्ष्मीजी, जवाहरलालजी आणि कृष्णाजींच्या शिक्षणाची जेवढी अपरंपार काळजी वाहिली, त्या मानाने प्रियदर्शिनीच्या शिक्षणाबाबतीत आपण हेळसांड करीत आहोत, अशी टोचणी जवाहरलालजींना लागून राहिली.

भारतातील चळवळीचे बदलते उग्र स्वरूप पाहून फिरोजजींनी प्रियदर्शिनीच्या बाबतीत केलेल्या सूचनेचे महत्त्व जवाहरलालजींना पटले आणि त्यांनी प्रियदर्शिनीला इंग्लंडला पाठविले.

वर्षभरात ब्रिस्टोल येथे तिथल्या मॅट्रिक्युलेशनचे शिक्षण पुरे करून इंदिराजींनी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीत नाव दाखल केले.

इंग्लंड हा आदर्श लोकशाहीप्रधान देश आहे. तिथे प्रामुख्याने तीन राजकीय पक्ष आहेत. पहिला कान्झरव्हेटिव्ह म्हणजे हुजूर पक्ष, दुसरा लेबर म्हणजे मजूर पक्ष आणि तिसरा लिबरल म्हणजे उदारमतवादी पक्ष. त्यांच्यात पक्षांतर्गत मतभेद जरूर असतील. पक्षांतर्गत सत्तास्पर्धा निश्चित असेल. पण आपला पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात काही प्रलोभने नजरेपुढे ठेवून उडी मारल्याची उदाहरणे सहसा आढळत नाहीत. त्यांच्याकडे पक्षद्रोह म्हणजे देशद्रोह समजतात.

हुजूरपक्ष हा साम्राज्यवादी पक्ष. मजूरपक्ष हा जनतेचा पक्ष म्हणजे पुरोगामी पक्ष. त्यांच्यात सतत अभ्यासवर्ग आणि सभा

उपसभा भरवतात. भारतातील अनेक होतकरू तरुण त्याकाळी इंग्लंडमध्ये होते. मजूरपक्षात जाऊन त्यांनी लोकशाहीचा अभ्यास केला आणि पुढे भारतात येऊन ते साम्यवादी कार्यकर्ते बनले.

फिरोजजी आणि इंदिराजी या दोघांनाही राजकारणाची गोडी असल्याकारणाने मजूरपक्षाच्या सभांना हजर राहून त्यांनी पुरोगामी लोकशाहीचा अभ्यास केला. अशा प्रकारे समानधर्मी अशा या दोघांचा काळ इंग्लंडमध्ये अत्यंत समाधानाचा गेला.

इंदिराजींनी इंग्लंडमध्ये कशीबशी दोन वर्षे काढली नसतील तोच हिटलरी विमाने इंग्लंडवर बाँबवर्षाव करू लागली. इंग्लंडात राहणे धोक्याचे वाटल्यामुळे भारतात परतण्याचा आपला विचार इंदिराजींनी जवाहरलालजींना कळविला. विजयालक्ष्मीजी आणि कृष्णाजींच्या मते इंदिराजींनी एकटयांनी प्रवास करू नये, त्यांना आणण्यास कुणी तरी पाठवावे असे होते. पण ही कल्पना शूर आणि साहसी इंदिराजींना पसंत पडली नाही. त्या एकटया आणि सुखरूप भारतात परत आल्या. त्यांच्या पापूंनी आणि आत्याबाईंनी इंदिराजींचे या साहसाबद्दल अपार कौतुक केले.

लवकरच फिरोजजीही भारतात परत आले आणि दोघेही भारतीय काँग्रेसच्या राजकारणात सक्रीय भाग घेऊ लागले.

इंग्लंडहून परत आल्यापासून तिथल्या हवामानाचा कदाचित गुण असेल. मूळच्याच सुंदर इंदिराजी अधिक सुंदर दिसू लागल्या आणि आता त्यांचे लग्न उरकून टाकायला हवे असे त्यांच्या आत्यांना वाटले. त्यांनी हा आपला विचार जवाहरलालजींच्या कानांवर घातला. त्यांनी 'ठीक आहे' असे मोघम उत्तर आपल्या भगिनीद्वयांना दिले.

एके दिवशी संधी साधून जवाहरलालजींनी प्रियदर्शिनीला

बोलावून घेतले. इंदिराजींनी येऊन विचारले,

'पापू, मला आपण बोलावलंत ?'

'होय प्रियदर्शिनी. विचारीन विचारीन म्हणतो ते आज विचारायचं ठरविलंय.'

'काय हवंय पापू तुम्हाला ?'

'मला काही नकोय. पण तू आता मोठी झालीस. तुझं लग्न करून टाकायला हवं. मुलंही सांगून येतात. पण सर्वांत तुझा विचार महत्त्वाचा, इतर सर्वांचे विचार गौण.'

'पापू, तुम्ही विचारलंत. फार बरं वाटलं. या बाबतीत माँजी असत्या तर मी माझा विचार त्यांच्या कानांवर कधीच घातला असता. पण पापू, तुम्ही पडलात वडील. तुमचं माझ्यावर कितीही प्रेम असलं तरी–'

'बेटी, इतर कुटुंबांत हे खरं असेल, पण माझ्या बाबतीत हे खरं नाही. कमला गेल्यापासून मी केवळ तुझा पिताच नाही तर मातासुद्धा आहे.'

इंदिराजींना असे वाटले की, आई म्हणून आपल्या पापूंना मायेने मिठी मारावी. पण मनात येणारे विचार योग्य असोत, अयोग्य असोत; कृतीत उतरतात असे नाही. इंदिराजी संकोचून, सलज्ज होऊन आपल्या पापूंना म्हणाल्या,

'पापू, या तुमच्या लाडक्या प्रियदर्शिनीने स्वतःच्या लग्नाबाबत स्वतंत्र निर्णय घेतला आहे. पापू, आवडेल ना तुम्हाला तो ? माँजीना नक्की आवडला असता आणि त्यांनी आनंदानं परवानगी दिली असती.'

'बेटा, किती अधीर झाली आहेस ? निर्णय तर सांगशील ?'

अधिकच सलज्ज होऊन, दृष्टी जमिनीकडे लावून, मनाचे धैर्य

एकवटून इंदिराजी म्हणाल्या,

'तुमच्या प्रियदर्शिनीने फिरोजजी गांधींशी विवाहबद्ध होण्याचं ठरविलं आहे.'

जवाहरलालजी एकदम गंभीर झाले. इंदिराजींनी विचारले,

'पापू, माझा निर्णय तुम्हांला आवडला नाही का ?'

'तसं काही नाही. अग, तू माझी कन्या ना ? मग तुझा निर्णय अयोग्य कसा असेल ? याबाबत मी तुझ्या आत्यांबरोबर बोलतो आणि तुला सांगतो.'

इंदिराजींची ही प्रेमकहाणी नेहरू घराण्यात कर्णोपकर्णी व्हायला वेळ लागला नाही. या वार्तेने आनंदभवनाच्या भिंती ओलांडल्या आणि अलाहाबादेत ती वाऱ्यासारखी पसरली. हा विवाह आंतरजातीय होणार होता. हिंदू सनातनी आणि पारशी सनातनी यांनी आपला या विवाहाला कडाडून विरोध दर्शविला. विजयालक्ष्मी आणि कृष्णाजींनीसुद्धा त्यांच्या कुटुंबात आंतर-जातीय विवाह घडून आले असतानासुद्धा या विवाहाला विरोध केला. या विरोधाने इंदिराजी दुःखी होऊ लागल्या. आणि इंदिराजींच्या दुःखाचे दुःख जवाहरलालजींना झाले. आपली एकुलती एक माँविरहीत प्रियदर्शिनी काही गैर करते आहे असे जवाहरलालजींना वाटले नाही. या विवाहाला मान्यता देण्याचे आणि तो साधेपणाने खासगीरीत्या उरकून टाकण्याचे त्यांनी ठरविले आणि तसे त्यांनी भगिनीद्वयांना कळविले. तरीही वादळ शांत होण्याची लक्षणे दिसेनात. अखेर सर्व परिस्थिती महात्मा-जींना कळवून त्यांचा सल्ला घेण्याचे व तो सर्वांनुमते मानण्याचे ठरले.

इंदिराजींना रुखरूख लागून राहिली होती. फिरोजजी त्यांचे

सांत्वन करीत होते. इतक्यात महात्माजींचा निर्णय आला,

'हा विवाह अभिनंदनीय आहे. याला माझा मनापासून आशीर्वाद आहे. या विवाहावर साधकबाधक जाहीर चर्चा झाली असल्यामुळे हा साधेपणाने आणि घरगुती स्वरूपात करण्यात येऊ नये. जास्तीत जास्त डामडौलाने व जाहीर रीतीने करावा.

महात्माजींचा हा आशीर्वादवजा निर्णय ऐकून इंदिराजींना आणि फिरोजजींना गगन ठेंगणे झाले. त्यांनी परमेश्वराचे आभार मानले.

- आणि अलाहाबादनगरीत मोठ्या थाटामाटात २६ फेब्रुवारी, १९४२ रोजी जवाहरलालजींनी आपल्या प्रियदर्शिनीचा हात फिरोजजींच्या हातात दिला.

---

### उजळणीचे प्रश्न

१) कमलाजींच्या निधनाचा परिणाम इंदिराजींवर काय झाला? २) आपल्या प्रियदर्शिनीच्याबाबतीत जवाहरलालजींना कोणती खंत लागून राहिली होती? ३) इंदिराजींच्याबाबतीत फिरोजजींनी जवाहरलालजींकडे कोणती सूचना केली.? ४) इंदिराजींचा इंग्लंडमधील काळ कसा गेला? ५) इंदिराजी इंग्लंडमधून कशा परत आल्या? का? ६) इंदिराजींच्या लग्नाबद्दल जवाहरलालजींशी त्यांचे काय बोलणे झाले? ७) लग्नाला कुणाकुणाचा विरोध होता? कसा? ८) अखेर जवाहरलालजींनी कोणता निर्णय घेतला? ९) इंदिराजींच्या लग्नाबाबत महात्माजींनी काय सल्ला दिला?

# ६

# झंडा ऊँचा रहे हमारा

१९४२ चे साल.

दुसऱ्या महायुद्धाने सारा युरोप होरपळून निघत होता. भारतातही स्वातंत्र्य चळवळीला जोर चढला होता. महात्माजींच्या सल्ल्याने काँग्रेसचे अधिवेशन मुंबईत भरले होते. इंग्रजांना 'चले जाव'चा इशारा देण्याचे ठरले होते.

या अधिवेशनाची निमंत्रणे भारतभरच्या पुढाऱ्यांना गेली. अलाहाबादेहून पंडितजी आले. अहमदाबादेहून सरदार आले. पाटण्याहून राजेंद्रबाबू आले. मद्रासहून राजगोपालाचारी आले. मध्यप्रदेशाचे शुक्ला, बंगालचे डॉ. रॉय उपस्थित झाले. कर्नाटकातून कर्नाटकसिंह गंगाधरराव देशपांडे आले. सिंधमधून कृपलानीजी तर सर्वप्रथम आले होते.

'न भूतो न भविष्यति' असे या अधिवेशनाचे स्वरूप ठरले. व्यवस्थापनासाठी दुसऱ्या फळीच्या नेतेमंडळींना बोलावून घेतले होते. लखनौला पत्र जाताच इंदिराजी आपले पतिराज फिरोजजींसह उपस्थित झाल्या. निष्ठेने आणि कष्टशीलतेने या दांपत्याने अधिवेशनात भाग घेतला.

महात्माजींनी ब्रिटिश सरकारला उद्देशून 'चले जाव'चा ठराव मांडला. मोठ्या जल्लोषात, टाळ्यांच्या गजरात तो एकमताने मंजूर झाला ह्या जयघोषाने उपस्थितांना उत्साहाचे एवढे भरते आले की, जणू आजच इंग्रज भारत सोडून गेले आहेत आणि आपण स्वतंत्र झालो आहोत, असे त्यांना वाटले. परंतु

चिवट ब्रिटिश शासन ही बंडखोरी कशी सहन करील ? १४४ कलम पुकारले गेले. नेत्यांना पकड वॉरंटे सुटली. त्याच रात्री धरपकडीला सुरुवात झाली.

इंदिराजींना घेऊन जवाहरलालजी अलाहाबादला आले. पण तिथे वॉरंट घेऊन आनंदभवनात पोलिस उपस्थित होतेच. त्यांनी जवाहरलालजींना अटक केली. इंदिराजी लगेच लखनौला गेल्या. तिथे त्यांना समजले की, फिरोजजी भूमिगत आहेत, त्यांच्यावर वॉरंट आहे.

मोठ्या धैर्याने ही परिस्थिती इंदिराजींनी सहन केली. त्या स्वस्थ बसल्या नाहीत. त्या घरोघरी जाऊन स्त्रियांत प्रचार करू लागल्या. त्यांना एक स्त्रियाचे पथक तयार करायचे होते.

वृत्तपत्रातून रोज रोज अनेकजण भूमिगत असल्याच्या व कुठे कुठे ते पकडले जात असल्याच्या बातम्या येत होत्या.

असेच एकदा लखनौतील काही कॉलेज विद्यार्थी त्यांच्याकडे आले. त्यांचा म्होरक्या म्हणाला,

'इंदिराजी, आम्ही एक विनंती करायला आलो आहोत.'

'बोला, तुमचं काय काम आहे ?'

'आम्ही तिरंगा हाती घेऊन, बंदीहुकूम मोडून मिरवणूक काढणार आहोत.'

'मग मी काय करावं असं म्हणणं आहे तुमचं ?'

'आपण जवाहरलालजींच्या कन्या आहात, आमचं नेतृत्व तुम्ही करा.'

'अवश्य. याला माझी आनंदानं तयारी आहे.'

'तुमची मिरवणूक कुठून निघणार आहे ? '

'कॉलेजच्या आवारातून उद्या सकाळी ठीक दहा वाजता.'

'तिथं मी वेळेवर येईन.'

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता इंदिराजी कॉलेजवर गेल्या. तिथे त्यांना एक विलक्षण दृश्य दिसले. सबंध कॉलेजला पोलिसांनी गराडा घातला होता. नाईलाज म्हणूनच पोलिस कॉलेजच्या आवारात शिरले नव्हते. विद्यार्थ्यांची मिरवणूक निघाली. पहिल्या रांगेतल्या विद्यार्थ्याच्या हातांत तिरंगा होता. गेटबाहेर मिरवणूक येताच पोलिसांनी तिरंगा धरलेल्या विद्यार्थ्यावर लाठीमार केला. त्या विद्यार्थ्याचा हात थरथरताच दुसऱ्याने तिरंगा आपल्या हातात घेऊन घट्ट पकडला. मिरवणूक रस्त्यावर येताच लाठीमार सुरू झाला. विद्यार्थी पांगले. तिरंगा पकडलेल्या विद्यार्थ्यावर लाठीचे तडाखे बसू लागले. त्यांची दयनीय परिस्थिती पाहून इंदिराजी तीरासारख्या पुढे धावल्या. त्यांनी त्यांच्या हातातला तिरंगा आपल्या हातात घेतला आणि त्यांनी हात उंचावून घोषणा दिली, ' झंडा ऊँचा रहे हमारा ! ' हे दृश्य पाहाताच कॉलेजच्या आवारातल्या सर्व बघ्या विद्यार्थ्यांनी आणि रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या नागरिकांनी ' इंदिरा गांधी की जय 'ची घोषणा दिली. या घोषणेने पोलिस जणू अपमानित झाले. इंदिराजी एक स्त्री आहेत याचे भान न ठेवता पोलिस अधिकाऱ्याने पुढे येऊन त्यांच्या पाठीत लाठी मारली. जणू काहीच झाले नाही अशा थाटात इंदिराजींनी पुन्हा घोषणा दिली, ' झंडा ऊँचा रहे हमारा ! '

पोलिस अधिकारी अधिकच चिडला. लाठीचे आणखी दोन तडाखे त्याने इंदिराजींना लगावले. इंदिराजी खाली कोसळल्या. तरीही उजवा हात उंचावून त्यांनी आपला तिरंगा खाली पडू दिला नाही. पोलिस अधिकाऱ्याकडे तुच्छतेने पाहत त्या म्हणाल्या,

‘ मैं नेहरूजीकी कन्या हूँ, मैं डरूंगी नही, चिल्लाऊँगी नही, तिरंगा झंडा छोडूंगी नही । ’

साऱ्या जमावाने त्या पोलिस अधिकाऱ्याचा हसून उपहास केला. पोलिस अधिकारी खजिल झाला. तो चिडला. इंदिराजींच्या हातातून तिरंगा हिसकावून घेऊन त्याने तो जप्त केला.

लाठीमाराने पाठ खूप दुखत असतानासुद्धा कोणाच्याही मदतीशिवाय इंदिराजी घरी आल्या. ग्लासभर थंड पाणी प्याल्यावर त्यांना थोडे बरे वाटले. अंग ठणकत होतेच. पाठीला थोडी सूज आलीही असावी, पण मनाने त्या आनंदी आणि समाधानी होत्या. स्वतःला उद्देशून त्या म्हणाल्या, ‘ लाठीमार खाल्लास पण पळून गेले नाही किंवा तिरंगा सोडला नाही. पापूंना हे कळलं तर त्यांना किती आनंद होईल. केवढा अभिमान वाटेल माझा त्यांना. ते नक्की म्हणतील, प्रियदर्शिनी, आज तू माझी कन्या शोभलीस. आझादीसाठी लढा देणं सतीचं वाण असतं आणि ते वाण पेलायला तू समर्थ ठरलीस, शाब्बास तुझी ! ’

अशा विचारांच्या खुषीतच इंदिराजींनी दोन घास खाल्लें आणि त्यांना डुलकी लागली. तासाभरानंतर त्या जाग्या झाल्या. त्यांनी डोळे उघडून पाहिले. भूमिगत असलेले फिरोजजी आपले कपाळ चेपीत आहेत असे त्यांना दिसले, त्या काही तरी बोलणार इतक्यात फिरोजजी म्हणाले,

‘ इंदू, मला सारं काही कळलंय. रात्री अंधाराचा फायदा घेऊन मी तुला भेटायला आलोय. तू माझी पत्नी आहेस म्हणून मला धन्यता वाटते.’

दा. १८४८
विषय २२

भारतरत्न प्रियदर्शिनी श्रीमती इंदिरा गांधी यांच्या जीवनाची जडणघडण अशा प्रकारच्या विलक्षण प्रसंगांतून झाली.

--

### उजळणीचे प्रश्न

१) १९४२ चे मुंबईतील काँग्रेस अधिवेशन 'न भूतो न भविष्यति' असे का ठरले ? २) या अधिवेशनाला इंदिराजींना का निमंत्रित केले होते ? ३) या अधिवेशनात कोणता क्रांतिकारक ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला ? ४) ब्रिटिश सत्तेवर त्याचा काय परिणाम झाला ? ५) इंदिराजी लखनौला का गेल्या ? लखनौत त्यांनी कोणते कार्य सुरू केले ? ६) कॉलेजचे विद्यार्थी इंदिराजींकडे का आले होते ? ७) त्यांच्या कोणत्या सूचनेला इंदिराजींनी होकार दिला ? ८) कॉलेजच्या विद्यार्थ्यांची मिरवणूक कशी निघाली ? ९) कोणत्या विद्यार्थ्यांवर पोलिस लाठीमार करीत होते ? १०) डी. एस. पी. ने इंदिराजींवर लाठीमार का केला ? ११) इंदिराजींना त्याला कोणते उत्तर दिले ? १२) इंदिराजी घरी कशा आल्या ? १३) लाठीमार खाल्ला असतानासुद्धा इंदिराजी समाधानी का होत्या ?

## ७

# – पण वेळ आली नव्हती

पंडित जवाहरलालजींची भारताच्या पंतप्रधानपदी निवड झाली होती. सर्व थरांतून त्यांना पाठिंबा होता. त्यांनी अधिकार-ग्रहण केले होते.

ब्रिटिशांनी स्वातंत्र्य दिले, पण भारताची फाळणी करून. मुस्लिमांचे पाकिस्तान आणि हिंदुंचे हिंदुस्थान ही त्यांची कल्पना. ब्रिटिशांची 'फोडा आणि झोडा' नीती प्रसिद्धच आहे. या फाळणी प्रकरणात जातीय दंगलींचा आगडोंब उसळला. पाकिस्तानात हिंदूंची कत्तल होऊ लागली. हजारो निर्वासित हिंदुस्थानात आले. याची प्रतिक्रिया भारतात उमटली नसती तरच नवल! सूड भावनेने मुसलमानांवर हल्ले होऊ लागले. हल्लेखोरांत हौसे, नवसेपेक्षा गवसेच अधिक होते. निरपराध मुस्लिमांना संरक्षण देणे पतप्रधान या नात्याने जवाहरलालजींनी कर्तव्य मानले. त्याप्रमाणे त्यांनी पोलिसांना सूचना दिल्या. शांतता समित्या स्थापन केल्या. प्रचार दौरे काढले गेले. जवाहरलालजींना यश येत गेले. तरी कुठे कुठे मुसलमानांवर किरकोळ हल्ले होत, होते.

असाच एकदा सूडाने पेटलेला एक माथेफिरू जवाहरलालजींच्या तीनमूर्तीत कुणी नाहीत असे पाहून शिरला. दरवाज्याच्या आड सुरा उगारण्याच्या पवित्र्यात तो लपून उभा राहिला. जवाहरलालजी येतील. दरवाजा उघडतील आणि आपला दुष्ट हेतू आपल्याला साध्य करता येईल, अशी त्याची कल्पना!

अर्धाएक तास निघून गेला असेल. दंगलभागात शांतता आणि सद्भाव स्थापन करण्यासाठी गेलेले जवाहरलालजी लवकर परत आले नाहीत. पण त्यांची कन्या इंदिराजी आपले शांतिदौऱ्याचे काम आटोपून तीनमूर्तीत परतल्या.

दिल्लीतील बहुसंख्य पोलीस दंगलभागात बंदोबस्तासाठी तैनात केले गेले असल्यामुळे तीनमूर्तीत हाताच्या बोटांवर मोजण्याइतके पोलिस होते. आपल्या जिवाला कसलाच धोका नाही

असे तिथे राहणाऱ्यांची कल्पना होती.

इंदिराजींनी व्हरांड्याच्या चार पायऱ्या चढून दरवाजा उघडताच दाराआड लपलेला माथेफिरू हातातला सुरा उगारून इंदिराजींच्या पुढे दत्त म्हणून उभा राहिला. इंदिराजींना पाहून तो दचकला. कदाचित ज्यांना मारावयाचे त्या या नव्हेत अशा समजुतीने तो क्षणभर गोंधळून गेला असेल. परंतु इंदिराजींच्या ध्यानात सर्व प्रकार येण्यास वेळ लागला नाही. त्यांनी प्रसंगावधान राखून त्या माथेफिरूला जोराने ढकलले. त्याच्या हातातील सुरा गळून पडला. तो बाजूस कलंडला. इंदिराजींनी सुरा आपल्या हाती घेऊन पहाऱ्यावरील पोलिसास हाक मारली. तथापि दरवाज्यातल्या गडबडीने फाटकावरचे पहारेकरी लगेच तिथे उपस्थित झाले होते. त्यांनी माथेफिरूला ताब्यात घेऊन त्याची तुरुंगात रवानगी केली.

हा सारा प्रकार पाचदहा मिनिटांतच घडून आला.

इंदिराजी आपल्या खोलीतल्या आराम खुर्चीवर बसून विचार करू लागल्या : केवढ्या भयानक प्रसंगातून आज आपण वाचलो! खरोखर ही देवाची कृपा होय.

पण दुसऱ्याच क्षणी त्यांच्या मनात विचार आला.

तो माथेफिरू काही आपल्याला मारायला आला नव्हता. पापूंना मारायला आला होता. आपण येण्यापूर्वी पापू आले असते तर?

इंदिराजींचे शरीर क्षणभर थरारले.

काही वेळाने जवाहरलालजी आपल्या दौऱ्यावरून परतले. घडलेली सारी हकीगत इंदिराजींनी त्यांच्या कानांवर घातली. जवाहरलालजी म्हणाले,

‘प्रियदर्शिनी, तू भाग्यवान आहेस.’

‘ मी कसली भाग्यवान ? ’

‘ का बरं ? ’

‘ अहो, तो गुंड तुम्हांला मारायला आला होता, मला नाही. ’

‘ पण एक स्त्री असून एवढं प्रसंगावधान दाखवलंस, धन्य आहे तुझी ! ’

‘ हे मात्र खरं. पण पापू –’

‘ काय प्रियदर्शिनी ? ’

‘ मी बेटी कुणाची आहे ?’

तशाही गंभीर अवस्थेत पितापुत्री दोघेही मनसोक्त हसले.

तीनमूर्तीतील संरक्षण व्यवस्था प्राप्त परिस्थितीत काहीशी शिथील करण्यात आलेली आहे, याची कल्पना जवाहरलालजींना होती. म्हणून तिथल्या पोलिसांवर त्यांनी काही कारवाई केली नाही. तरी ते विचारे आपण नोकरीला मुकणार या भीतीने चिमणीएवढी तोंडे करून खिन्न होऊन बसले होते.

चार दिवस लोटल्यावर इंदिराजी आपल्या वडिलांना म्हणाल्या,

‘ पापू, एक विचारू ?’

‘ बोल प्रियदर्शिनी, तुला काय हवंय ?’

‘ मला काही नकोय. तुम्हांलाच संरक्षणाची, तुमच्याजवळ राहू शकेल अशा घरगुती माणसाची जरुरी आहे. मी राहू का येऊन तुमच्याजवळ या तीनमूर्तीत ?’

‘ अवश्य, पतिराजांसह सहपरिवार. ’

फिरोजजी, इंदिराजींसह राजीव, संजयना घेऊन काही दिवस तीनमूर्तीत राहायला आले.

––

**उजळणीचे प्रश्न**

१) ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य कसे दिले ? त्याचा काय परिणाम झाला ? २) दंगलीचा फायदा प्रामुख्याने कोण उठवितात ? ३) पंत-प्रधान या नात्याने जवाहरलालजींनी दंगलीबाबत कोणती जबाबदारी मानली होती ? ४) तीनमूर्तीतील पोलिस बंदोबस्तात शिथीलता का आली होती ? ५) इंदिराजींना पाहून तो माथेफिरू का दचकला ? ६) प्रसंगावधान राखून इंदिराजींनी काय केले ? ७) माथेफिरू पकडला गेल्यावर इंदिरा-जींच्या मनात कोणते विचार आले ? ८) जवाहरलालजींनी इंदिराजींचे कौतुक कसे केले ? त्याला इंदिराजींनी काय उत्तर दिले ? ९) इंदिरा-जींची कोणती विनंती जवाहरलालजींनी मानली ?

## ८

# क्रौर्य आणि शौर्य

निःशस्त्र प्रतिकाराने भारताला स्वातंत्र्य मिळाले असे सांगितले जाते. हे काहीसे खरे असले तरी त्याला एक विषादाची किनार आहे. ब्रिटिशांना हिंदुस्थान सोडून जाताना आनंद झाला होता का ? साम्राज्यवादी ‘ बुलडॉग ’ चर्चिलने तर नेत्रांत अश्रू आणले होते म्हणे.

कावेबाज ब्रिटिशांनी हिंदू-मुसलमानांत भांडणे लावली. हिंदु-स्थानचे दोन भाग केले आणि नजीकच्या भविष्यकाळात दोनही देश सामर्थ्यसंपन्न होऊ नयेत अशी जणू व्यवस्थाच केली. पाकि-

स्तानच नव्हे, तर हिंदुस्थानसुद्धा ब्रिटिशांच्या या कुटील नीतीला फसले. आम्हांला इंग्लंड जवळचे वाटू लागले. पाकिस्तान शत्रू वाटू लागले. वास्तविक पाकिस्तानातील मुसलमान कालच्या हिंदुस्थानचे नागरिक होते. म्हणजे आमचेच बांधव होते.

फाळणीबरोबर जातीय दंगलीने डोके वर काढले. पाकिस्तानातल्या हिंदूंवरील अत्याचाराचा बदला भारतात मुसलमानांवर घेण्यात येऊ लागला. मुख्यत: या दंगली दिल्ली-कलकत्त्यासारख्या ठिकाणी वाढत्या प्रमाणावर झाल्या.

अशा पार्श्वभूमीवर भारताचे पंतप्रधान म्हणून जवाहरलालजी जबाबदारीने आणि कर्तव्यतत्परतेने कारभार हाकीत होते. प्राणपणाने निरपराध मुसलमानांना संरक्षण देण्याचा जणू त्यांनी निश्चयच केला होता. परंतु जात्यंध केव्हा डोके वर काढतील आणि लुटालूट जाळपोळ करतील याचा नेम नव्हता. असे प्रसंग म्हणजे गुंडांना मोठी पर्वणीच असते.

अशीच एकदा दिल्लीत दंगल उसळली असता प्रयत्नपूर्वक ती शांत करण्यात आली होती. पण धुमसणाऱ्या लाकडाला धूर सुटावा आणि ते पुन्हा केव्हा पेट घेईल याचा नेम नसावा, अशी स्थिती होती.

जवाहरलालजी काही कामानिमित्त असेच बाहेर गेले असता एका मुसलमान कुटुंबावर हिंदू हल्ला करून आतील रहिवाश्यांसह मुसलमानाचे घर पेटवून लावण्याच्या तयारीत आहेत, अशी सनसनाटी बातमी तीनमूर्तीत राहणाऱ्या इंदिराजींच्या कानी आली. वार्ता घेऊन आलेला नागरिक घाबरत लगबगीने इंदिराजींना म्हणाला,

'बहनजी, आता संपलं.'

'काय संपलं ?'

'गुंड त्या मुसलमानांना त्यांच्या घरासकट पेटवून लावल्याशिवाय राहणार नाहीत. जवाहरलालजी तर घरात नाहीत, मग मी आता कुणाकडं जाऊ ?'

'बाबा, धीर धर. असं अवसान टाकून चालत नसतं.'

एक स्त्री असून इंदिराजी त्याला धीर देत होत्या. तर तो धट्टाकट्टा पुरुष असून गर्भगळीत झाला होता. तो मनुष्य निघून गेला. इंदिराजींनी ड्रायव्हरला बोलावून घेतले व जीप काढण्यास सांगितले.

मुलांना आयाच्या ताब्यात देऊन दंगलग्रस्त ठिकाणी इंदिराजी स्वत: गेल्या. जीपमधून त्या खाली उतरल्या. दंगलखोरांचा तो जमाव पाहून ड्रायव्हरला वाटले की, आता लोक माझ्यासकट ही जीप जाळून टाकल्याशिवाय राहणार नाहीत. इंदिराजींनी त्या लोकांकडे पाहिले. जीपच्या आवाजानं लोकांचे डोळे इंदिराजींकडे आधीच लागले होते. इंदिराजी ओरडल्या,

'खबरदार, कुणी त्या घरात शिरेल तर !'

क्षणभर दंगलखोर शांत झाले, पण दुसऱ्याच क्षणाला ते इंदिराजींना अद्वातद्वा बोलू लागले. त्यांच्या बोलण्याकडे इंदिराजींनी पूर्ण दुर्लक्ष केले. त्या बेधडक गर्दीत घुसल्या. नाईलाजाने लोकांना इंदिराजींना वाट द्यावीच लागली. इंदिराजी त्या घरात शिरल्या. भीतीने रडकुंडीला आलेल्या त्या मुसलमान कुटुंबियांना धीर देत त्या म्हणाल्या,

'भाईयों, डरो मत। आओ मेरे पीछेसे। मैं देखती हूँ, तुम्हारा कौन क्या बिगाडता है।'

इंदिराजींच्या आश्वासनावर त्या मुसलमानांचा बिलकुल

विश्वास वसला नाही. तरीपण इंदिराजींच्या सूचनेप्रमाणे त्यांच्यामागून जाण्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते.

त्या पाच जणांच्या मुस्लीम कुटुंबाला इंदिराजींच्या मागून येत असताना लोकांनी पाहिले. ते आश्चर्याने थक्क झाले. पुन्हा इंदिराजी ओरडल्या,

'खबरदार यांच्या अंगाला कुणी हात लावला तर! भ्याड कुठले! पराक्रम वाचविण्यात असतो; मारण्यात नसतो. निरपराध्यांना मारणं क्रौर्य आहे, त्यांना जीव धोक्यात घालून वाचविणं शौर्य आहे.'

इंदिराजींच्या उद्‌गारांचा परिणाम तत्काल झाला. गर्दी पांगली. गर्दीतले दोघेजण अनाहूतपणे 'इंदिरा गांधी की जय' असे ओरडले.

त्या मुस्लीम कुटुंबाला इंदिराजींनी आपल्या जीपमध्ये घेतले आणि तीनमूर्तीमध्ये आणून त्यांना आसरा दिला. इंदिराजींबद्दल केवढे प्रेम त्याक्षणी त्या मुस्लीम कुटुंबात निर्माण झाले असेल, हे शब्दाने वर्णन करता येणार नाही.

संध्याकाळी आपले काम आटोपून जवाहरलालजी तीनमूर्तीत आले. त्यांना सर्व हकीगत समजली. आपल्या प्रियदर्शिनीच्या धाडसाचे, शौर्याचे त्यांनी अपार कौतुक केले.

त्या मुस्लीम वस्तीवर जवाहरलालजींनी त्वरित बंदोबस्तासाठी पोलिस पाठवून दिले. तिथे एक नवीन चौकीच बसविली.

एक आठवडाभर तीनमूर्तीचा पाहुणचार घेऊन ते मुस्लीम कुटुंब आपल्या घरात आनंदाने राहायला गेले.

इंदिराजींचा हा अलौकिक पराक्रम दिल्लीभर झाला. यामुळे त्यांच्या मूळच्या लोकप्रियतेत अधिकच भर पडली. दुसऱ्या दिवशी

नजिकच्या वृत्तपत्रात ही बातमी आली. मग अनेक वृत्तपत्रांचे कॅमेरे दुसऱ्या दिवशी इंदिराजींचे फोटो टिपण्यासाठी आणि वार्ताहर मुलाखती घेण्यासाठी अहमहमिकेने आले नसते तरच नवल !

——

**उजळणीचे प्रश्न**

१) फाळणीचा परिणाम भारतीय जनसामान्यांवर काय झाला ? २) भारतात जातीय दंगली कुठे उसळल्या ? ३) तीनमूर्तीमध्ये इंदिराजींना कोणती बातमी मिळाली ? त्यावर इंदिराजींनी कोणती कृती केली ? ४) घटनास्थळी इंदिराजींना काय दिसले ? ५) परिस्थितीशी त्यांनी कसा सामना दिला ? ६) लोकांनी कोणती प्रतिक्रिया व्यक्त केली ? ७) या प्रसंगी त्यांचे कोणते गुण व्यक्त झाले ? ८) ही घटना ऐकून जवाहरलालजींना काय वाटले ?

# ९

# सक्रीय राजकारण

तीनमूर्तीमध्ये पंतप्रधान असूनही तसे जवाहरलालजी एकटेच होते. कृष्णाजी हाथीसिंग मुंबईलाच राहत होत्या. त्यांचा संसार, त्यांची दोन मुले, त्यांचे शिक्षण यात त्या गर्क होत्या. त्याचप्रमाणे विजयालक्ष्मी सुद्धा त्यांचे पती रणजित पंडित, त्यांची कामे, त्यांच्या तीन मुली, त्यांचे शिक्षण व अन्य बऱ्याच व्यापात

त्या गर्क होत्या.

तशात मधून मधून जवाहरलालजींना धमकीची निनावी पत्रे येत. अशा पत्रांना ती निनावी असल्यामुळे 'मी अशा भित्र्या भेकडांना भीक घालीत नाही.' असे जवाहरलालजी निर्भयपणे म्हणत. पण इंदिराजींचे स्त्रीमन होते. स्त्रीमन हे नेहमीच शंकित असते. जवाहरलालजींवरील एका सुरामारी प्रसंगातून त्या निभावून गेल्या होत्या.

फिरोजजींच्या अनुमतीने आणि जवाहरलालजींची एक आवश्यक गरज म्हणून त्या आपल्या मुलांना घेऊन तीनमूर्तीत येऊन राहिल्या.

दोन मुलांप्रमाणे आपण पापूंनाही सांभाळीत आहोत, याचा त्यांना अभिमान वाटे. भारताचे पंतप्रधान म्हणजे लवकर सकाळपासून उशिरा रात्रीपर्यंत गडबडच गडबड. कार्यकर्ते भेटायला येत, पत्रकार येत. फोन खणखणत. परदेशी प्रतिनिधी येत. राजदूत येत. अशा सर्व प्रसंगी तीनमूर्तीची यजमानीण म्हणून इंदिराजींनी फार मोलाची साथ जवाहरलालजींना दिली. या त्यांच्या सहकार्याचे कौतुकाने ते वर्णन करीत : लोकांना मंदिराचा कळस दिसतो. पायाचा दगड दिसत नाही.

१९४७ पासून १९५९ पर्यंत तीन-चार वेळा विदेश दौऱ्यावर जवाहरलालजी गेले. त्यांच्याबरोबर इंदिराजी होत्या. परदेशातले रीतिरिवाज, मनुष्य स्वभाव, ओळखी असा अनुभवांचा प्रचंड साठा इंदिराजींनी केला.

१९५९ मध्ये त्यांना काँग्रेसच्या अध्यक्षा म्हणून निवडून देण्यात आले.

१९६० साली सप्टेंबर महिन्यात दुर्दैवाने फिरोजजींना हृदय-

विकाराचा झटका आला आणि त्यातच त्यांचे दुःखद निधन झाले. या निधनामुळे इंदिराजींना विलक्षण धक्का बसला.

आता आणखीन धक्के खायचे त्यांच्या नशिबात होते.

चीनने भारतावर आक्रमण केले. चौ एन लायने भारताला भेट देऊन पंचशीलाला मान्यता दिलेली होती आणि हिंदी चिनी भाई भाई म्हणून सारी दिल्ली निनादून सोडली होती. अशा-प्रकारे चौ एन लायने पाठीत खंजीर खुपसावा, याचे फार दुःख जवाहरलालजींना झाले आणि ती गोष्ट त्यांनी मनाला लावून घेतली.

या चीन आक्रमण प्रसंगी संरक्षणमंत्रीपदी असलेले कृष्ण मेनन यांनी पंतप्रधानांची फसवणूक केल्याचा आरोप लोकसभेत विरोधी पक्षांनी केला आणि त्यांना राजीनामा देणे भाग पाडले. नंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांना सन्मान-पूर्वक बोलावून घेऊन त्यांना संरक्षणमंत्रीपद दिले. महाराष्ट्रात या घटनेचे अपार स्वागत झाले. हिमालयाच्या मदतीला सह्याद्री गेला, असे ठळक मथळे वृत्तपत्रांनी दिले. कृष्ण मेनन यांचा नेहरू कुटुंबाशी अत्यंत जवळचा संबंध होता. कृष्ण मेनन कट्टर समाज-वादी होते. इंदिराजींचा ओढा समाजवादाकडे असल्यामुळे कृष्ण मेननना त्यांनी जणू गुरुस्थानी मानले होते.

काश्मीर प्रश्न जेव्हा युनोत गेला तेव्हा भारताची बाजू मांड-ताना कृष्ण मेनननी आठ आठ तासांची भाषणे मोठ्या प्रभावीपणे करून, आपले वक्तृत्व आणि विद्वत्ता प्रकट केली होती. राज-कारणात कृष्ण मेननची जी मानहानी झाली, त्याचा नेहरू कुटुंबाला काहीसा विषाद वाटल्यावाचून राहिला नाही.

पुढे जवाहरलालजींची प्रकृती ढासळतच गेली आणि १९६४

च्या मे महिन्यात २७ तारखेस त्यांचे निधन झाले.

अखेरी अखेरीस त्यांना बसण्या–उठण्याचा आणि चालण्याचा जो त्रास होत होता, त्यामुळे जवाहरलालजींनंतर जणू कुणी नाहीच म्हणून शेवटच्या क्षणापर्यंत जवाहरलालजी देशाची धुरा प्राणपणाने सांभाळीत आहेत, असे लोक बोलू लागले.

जवाहरलालजींचे निधन झाले आणि इंदिराजी पोरक्या झाल्या. पतिनिधनानंतर चारच वर्षांत वडिलांच्या निधनाचा धक्का त्यांना सहन करावा लागला.

जवाहरलालजींच्या नंतर कोण ? याचा शोध सुरू झाला.

काँग्रेसमधील एका गटाने शास्त्रीजींचे नाव सुचविले तर दुसऱ्या गटाने इंदिराजींचे नाव सुचविले. शास्त्रीजींची बाजू त्यांचे अभिमानी प्रकर्षाने मांडत. ते सांगत : रेल्वे अपघात झाला. शास्त्रीजींनी रेल्वेमंत्री म्हणून त्याची नैतिक जबाबदारी स्वत:वर घेतली आणि त्यांनी राजीनामा दिला. त्यांच्याच पार्टीने त्यांना निर्दोष ठरवून राजीनामा परत घेण्याची विनंती केली. पण निर्लोभ शास्त्रीजींना ते मान्य झाले नाही. जवाहरलालजींनी भर लोकसभेत अत्यंत गौरवाने राजीनामा स्वीकारला. त्यावेळी जवाहरलालजी म्हणाले होते,

'घटना बोलणं आणि घटना जगणं यात फरक आहे. आम्ही घटना बोलतो.शास्त्रीजींनी घटना जगून दाखविली.' बिनखात्याचे मंत्री म्हणून पुढे जवाहरलालजींनी शास्त्रीजींची नियुक्ती केलीच. म्हणजे जवाहरलालजींच्या आजारीपणात त्यांची सारीच खाती शास्त्रीजींनी समर्थपणे सांभाळली होती. तेव्हा आपल्या पश्चात् शास्त्रीजीच पंतप्रधान असावेत, असे जवाहरलालजींचे मत होते.

इंदिराजींची बाजू त्यांचे समर्थक तितक्याच समर्थपणे मांडत.

ते म्हणत : इंदिराजींनी जवाहरलालजींच्या सावलीत अनेक वर्षे राहून राजकारणाचे उत्तम धडे गिरविले आहेत. अनेक वेळेला त्यांनी परदेशांचा प्रवास केला आहे. राज्यकारभाराची प्रत्यक्ष माहिती त्यांनी घेतली आहे आणि इंदिराजींची निवड केल्याने महात्माजींचे निदान निम्मे स्वप्न साकार केल्यासारखे होणार आहे. महात्माजींचे स्वप्न होते : भारताची पंतप्रधान हरिजन स्त्री व्हावी.

दोन्ही गट आपापल्या विचारांशी कायम होते. ही कोंडी इंदिराजींनी फोडली. त्यांनी जाहीर केले : शास्त्रीजींचा आणि जवाहरलालजींचा घरोबा अनेक वर्षांचा. ते माझ्यापेक्षा वयाने, ज्ञानाने, अनुभवाने मोठे आहेत. ते माझे जणू चाचाजीच आहेत. मी त्यांच्याच नावाला हार्दिक पाठिंबा देते.

शास्त्रीजी पंतप्रधान झाले आणि त्यांच्या मंत्रिमंडळात इंदिराजींना समाविष्ट करून घेण्यात आले. त्यांच्याकडे माहिती व नभोवाणी खाते सुपूर्त करण्यात आले.

इतर खात्यांच्या मानाने हे खाते फारसे महत्त्वाचे नाही. पण इंदिराजींनी आपल्या कौशल्याने, पुरोगामित्वाने, कष्टशीलतेने त्यात चैतन्य आणले. बालशिक्षण, प्रौढशिक्षण यांकरिता नभोवाणीचा किती उत्तम उपयोग होऊ शकतो याचा आदर्श त्यांनी घालून दिला.

शास्त्रीजींसारखी वामनमूर्ती काय कारभार हाकणार, अशा घमेंडीत पाकिस्तानचा हुकूमशहा याकूबखानाने काश्मीर प्रश्नाचे निमित्त करून भारताविरुद्ध युद्ध पुकारले. त्या वेळी शास्त्रीजींनी राष्ट्राला उद्देशून दिलेली घोषणा आजही मार्गदर्शक म्हणून उपयोगात आणली जाते. ती म्हणजे 'जय जवान ! जय किसान !'

पाकिस्तान पराभूत झाले. रशियाच्या मध्यस्थीने तह करण्यात आला. ताश्कंदला वाटाघाटी होऊन तहनाम्यावर सह्या करून शिक्कामोर्तब करण्यात आले.

शास्त्रीजींना तत्पूर्वी तीन महिने हृदयविकाराचा त्रास होत होता. ताश्कंदला दगदगीने त्यांचा विकार बळावला आणि तिथे त्यांचा दु:खद अंत झाला.

शास्त्रीजींनंतर १९६६ साली जानेवारी महिन्यात इंदिराजींची पक्ष नेतेपदी निवड होऊन पंतप्रधान म्हणून त्यांचा शपथविधी उरकण्यात आला.

--

### उजळणीचे प्रश्न

१) इंदिराजी तीनमूर्तीत येऊन का राहिल्या? त्याचा त्यांना कसा फायदा झाला? २) काँग्रेसच्या अध्यक्षपदी असता त्यांना कोणते धक्के सहन करावे लागले? ३) चीन स्वारीचा परिणाम कृष्ण मेनन यांच्यावर काय झाला? ४) यशवंतराव चव्हाणांना जवाहरलालजींनी का पाचारण केले? ५) काश्मीर प्रश्नी कृष्ण मेननी युनोत कशी कामगिरी बजावली? ६) जवाहरलालजींच्या निधनानंतर पक्षनेतेपदासाठी कुणाची नावे पुढे आली? ती का? ७) इंदिराजींनी आपल्या नावाला का अनुमती दिली नाही? ८) शास्त्रीजींच्या मंत्रिमंडळात इंदिराजींना कोणते खाते देण्यात आले? ते त्यांनी कसे सांभाळले? ९) शास्त्रीजींच्या कारभाराबद्दल थोडक्यात माहिती द्या. १०) कशा परिस्थितीमध्ये शास्त्रीजींचे निधन झाले?

# १०

# हिन्दी बाँगला भाई भाई

गतीने वाहणाऱ्या नदीच्या तीरावर निसर्गरम्य ठिकाणी एका सरकार-सुरक्षित हॉटेलमध्ये तो बातमीदार राहत होता. सर्व प्रकारच्या सुखसोयी तिथे त्याला उपलब्ध असल्या तरी एकूण त्याचे मन विषण्णच होते. कारण त्याच्या राष्ट्राच्या धोरणाशी सुसंगत अशी खमंग बातमी बरेच दिवस पाठवायला त्याला मिळाली नव्हती. तिसऱ्या मजल्याच्या गॅलरीत चिरूट फुंकत तो उभा होता. रस्त्यावरून भरधाव धावत जाणारी एक रिक्शा त्याने पाहिली. आत बसलेला हिंदी जवान आहे, हे त्याने त्याच्या सैनिकी गणवेषामुळे ओळखले. हिंदी जवान म्हटल्याबरोबर त्याच्या मनात अनेक विचारतरंग गर्दी करू लागले. रिक्शा कुठे गेली हे त्याने पाहिले आणि त्याला आश्चर्य वाटले. कारण त्या हॉटेलपासून थोड्याच अंतरावर रिक्शा थांबली होती. तिच्या-भोवती बरेच बाँगला बाबू गोळा झाले होते. हिंदी जवान सर्वांना समजावून सांगत होता. परंतु बाँगला बाबूंचे नकारार्थी हातवारे चालूच होते.

त्या बातमीदाराला मनात आनंद झाला. हिंदी जवान रिक्षाचे भाडे देत नसावा, निदान कमी देत असावा असे त्याला वाटले. निकरावर आलेल्या भांडणाचे पर्यवसान आता मारामारीत होईल, एक-दोन बाँगला बाबू जखमी होतील, हिंदी जवानाचा निदान गणवेष खराब होईल आणि आपल्या वार्तापत्राला खमंग बातमी पाठवायला मिळेल, अशा खुषीत तो वार्ताहर त्या घटनास्थळी

जावयास निघाला. अंतर अत्यंत कमी असतानासुद्धा तो एका टॅक्सीतून गेला. कोणी वडा ऑफिसर असावा असे समजून गर्दीने त्याला प्रवेश दिला. पुढें जाऊन तो रिक्शावाल्याला म्हणाला,

'काय आहे?'

'आता तुम्हीच समजावून सांगा ना साहेब या जवानाला!'

'अरे बाबा,' नवजवानाला उद्देशून तो वार्ताहर म्हणाला, 'का तंग करतोस रिक्शावाल्याला. विचारा गरीब आहे तो जे भाडे मागत असेल ते त्याला देऊन टाक. पाकिस्तान्यांनी त्यांना लुटलंय आणि तुम्ही हिंदी त्यात का भर घालता?'

'आणि साहेब, मी तर हेच म्हणतोय. पाच रुपये द्यायला मी तयार झालोय, पण हा घ्यायलाच तयार नाही.'

'मोड नसेल तर तो तरी काय करील? अरे, ही तर अनेकांची युक्ती असते. भारी नोटा काढायच्या, मग मोड मिळत नाही. फुकट प्रवास करून वर ऐटीत सटकायला मिळतंय.'

'हे पहा साहेब,' नवजवानाचे मन दुखावले गेले. 'असं भलतं-सलतं बोलू नका. तुमच्या तिकडे तसं चालत असेल. माझी प्रथम तक्रार काय आहे, चौकशी करा मग बोला. खरं पाहता आम्ही तुम्हांला बोलावलं नाही आणि तुमच्या फुकट फौजदारीची आम्हांला गरजही नाही.'

बाँगला बाबूंचा रोख आता त्या वार्ताहरावर गेला. ते त्याला तावातावाने म्हणाले,

'हिंदी जवान आमचे मुक्तिदाते आहेत. त्यांच्याकडून आम्ही भाडे घेणार नाही. एवढे आम्ही निमकहराम नाही. बाँगलाबाबू उपाशी मरेल, पण कृतघ्न होणार नाही.'

एकूण मामला वार्ताहराच्या लक्षात आला. त्याचा चेहरा

खाडकन पडला. सर्वांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले. नवजवान रिक्शावाल्याच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाला,

' भैय्या, तुझं म्हणणं मला मान्य आहे. पण भारतीय सैनिक फुकट प्रवास करीत नसतो. आता असं कर, हे पाच रुपये घे. रिक्शाभाडं म्हणून नव्हे, तर तुझ्या मुलाबाळांना या हिंदी चाचाजीची मिठाईसाठी भेट म्हणून !'

रिक्शावाल्याने भरल्या डोळ्यांनी त्या नोटेचा स्वीकार केला. जवानाला त्याने कडकडून मिठी मारली. बाँगलाबाबूंनी एकच ललकारी दिली –

हिंदी–बाँगला भाई भाई !

शेख मुजीबुर रहमान की जय !

इंदिरा गांधी की जय !

त्या बाँगला बाबूने हिंदी नवजवानाला मिठी मारीत असताना दुरून कोणीतरी त्यांचा फोटो घेण्यात गर्क होते. त्या जवानाच्या नजरेतून ही गोष्ट सुटली नाही. त्याने त्या कॅमेरावाल्याला जवळ बोलावून विचारले,

' मिस्टर, तुम्ही आमचा फोटो का घेतलात ? '

' त्यात काय बिघडलं ? '

' अहो, गणवेषातला आमचा फोटो कुणी घेऊ शकत नाही. त्याला आमच्या साहेबांची प्रथम परवानगी लागते. '

' त्याची नको काळजी. मी देतो तुला मिळवून तुझ्या साहेबांची परवानगी. '

' आँ ? म्हणजे तू बडा साहेब झालास का ? '

' तसं नाही नवजवाना, मी एका प्रतिष्ठित वृत्तपत्राचा बातमीदार आहे. मला कुठंही संचार करायला व फोटो घ्यायला तुझ्या

साहेबाच्या साहेबाची परवानगी आहे.'

असे म्हणत त्याने आपल्या खिशातला पत्रकारितेचा परवाना त्या नवजवानाला दाखविला.

त्या बाँगला रिक्शावाल्याला तो पत्रकार म्हणजे खराच मोठा साहेब वाटला. तो त्या पत्रकाराला म्हणाला,

'साहेब, माझं घर जवळ आहे. मी या नवजवानाला घरी नेऊन चहा देणार आहे. माझी मुलं याला आदरपूर्वक नमस्कार करणार आहेत. तुम्हीही आमच्या घरी आपली पायधूळ झाडलीत तर मी स्वतःला धन्य समजेन.'

त्या पत्रकाराने त्या रिक्शावाल्याचे आमंत्रण आनंदाने स्वीकारले. कारण त्याने त्याला चमचमीत खमंग बातमी दिली होती.

तो रिक्शावाला त्या दोन मेहमानांना घेऊन घरी आला. दरवाज्यात त्याची बिबी आणि दोन मुले उभी होती. ती बिबी लाजून आणि मुले घाबरून आत पळाली. एका खोलीत ते तिघे बसले. तो रिक्शावाला मन भरून आल्यामुळे त्या नवजवानाला म्हणाला,

'भैय्या, तुमच्या इंदिराजींनी कमाल करून दाखविली. तिकडे पश्चिम आघाडीवरही पाकिस्तानला धूळ चारली जात आहे आणि इकडे आमचा सोनार बाँगला तर मुक्त झालाच आहे. या तुमच्या पंतप्रधानबाई आणखी काय काय दिव्य करणार आहेत, ते एक त्या अल्लालाच माहीत.'

'हे बघ भाई,' नवजवान बोलू लागला, 'हे राजकारण आम्हांला काही कळत नाही नी त्याची आम्ही कधी चर्चा करीत नाही. आम्हांला हुकूम मिळेल तेवढाच आम्ही पाळतो – अगदी सर्वशक्तीनिशी.'

‘पण मला माहीत आहे ना आमच्या इंदिराजी काय करणार आहेत, त्या. मी पत्रकार असल्यामुळे ते सगळं माहीत असणं आवश्यक आहे.’

‘मग भैय्या,’ तो बाँगलाबाबू अधीरतेने म्हणाला, ‘मग आम्हांला सांग ना थोडं.’

तो पत्रकार अभिमानाने उद्गारला,

‘बाँगलात पाकिस्ताननं शरणागती पत्करली आहे. आघाडी निकालात निघाली आहे. जवळजवळ एक लाख पाकी सैनिकांना हिंदी आणि बाँगला सैनिकांनी गिरफदार केलं आहे.’

‘धन्य ! धन्य !’ बाँगलाबाबूने धन्यता दर्शविली.

‘आता पुढं काय घडणार हे सांगायला ज्योतिष नको –’

‘ज्योतिष नको तर टाक सांगून पटकन.’ तो नवजवान म्हणाला. ‘मला ड्यूटीवर जायचंय.’

पत्रकाराने थोडक्यात निक्षून सांगितले,

‘एक लाख पाकी सैनिक भारतात सुरक्षित नेले जातील. पाकिस्तानच्या कैदेतून शेख मुजीबुर रेहमानांची सुटका केली जाईल. बाँगलाचं स्वातंत्र्य जाहीर केले जाईल आणि मग स्वतंत्र बांगला राष्ट्रात इंदिराजी निमंत्रणावरून आनंदानं, अभिमानानं आणि कृतकृत्यतेनं प्रवेश करतील. उभे बाँगला राष्ट्र त्यांना डोक्यावर घेऊन नाचेल आणि म्हणेल,

बाँगला राष्ट्राचा विजय असो !<br>
शेख मुजिबुर रेहमान की जय !<br>
बाँगला मुक्तिदात्या इंदिरागांधी की जय !

त्या वार्ताहराचे अंदाज तंतोतंत खरे ठरले.

इंदिराजींची बांगला भेट ऐतिहासिक ठरली. त्यांच्या या कर्तृत्वाने जगाचे डोळे दिपून गेले.

—

### उजळणीचे प्रश्न

१) अमेरिकन बातमीदार कुठे राहत होता ? का ? २) त्याला रस्त्यावर काय दिसले ? त्याची उत्सुकता कशी जागी झाली ? ३) त्याला आनंद का झाला ? मग त्याने काय केले ? ४) भारतीय जवानाला तो वार्ताहर काय म्हणाला ? ५) जवानाने त्या बातमीदाराची कानउघाडणी कशी केली ? ६) रिक्षावाल्याने त्याला कसे खडसावले ? ७) जवानाने दिलेली पाचाची नोट रिक्षावाल्याने कशीतरी का स्वीकारली ? ८) बाँगला-बावूंनी कोणती ललकारी दिली ? ९) लांबून फोटो घेणारा कोण होता ? त्याने रिक्षावाल्याचे आमंत्रण का स्वीकारले १०) मुले घाबरून घरात का पळाली ? ११) रिक्षावाल्याने इंदिराजींबद्दल कोणते उद्‌गार काढले ? १२) भारतीय जवान चर्चा का टाळीत होता ? १३) भारतीय पत्रकाराने इंदिराजींची भूमिका कशी स्पष्ट केली ?

# इंदिराजी अमर रहे

बुधवार, दि. ३१, ऑक्टो. ८४ रोजी सकाळी ९-२० वाजता इंदिराजी आपल्या सफ्दरजंग रोडवरील निवासस्थानातून बाहेर पडत असताना सुरक्षा दलातील दोन सैनिकांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यांना त्वरित ' ऑल इंडिया इंस्टिटच्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस ' येथे उपचारार्थ हलविण्यात आले. उपचाराचा काही उपयोग न होता ११ वाजण्याच्या सुमारास त्यांचे निधन झाले.

त्यांचा निष्प्राण देह प्रथम त्यांच्या निवासस्थानी नेण्यात आला व सायंकाळी ' तीनमूर्ती 'मध्ये लोकांच्या दर्शनार्थ ठेवण्यात आला. शनि. सकाळी ६ वाजेपर्यंत त्यांचे जनताजनार्दनाने अंत्यदर्शन घेतले. त्यात लहानथोर, स्त्रीपुरुष, देशातील परदेशातील लोक होते. सायंकाळी चार वाजता त्यांची अंत्ययात्रा निघाली. त्यात शंभरहून अधिक राष्ट्रांच्या प्रमुखांनी, प्रतिनिधींनी, लक्षावधी भारतीयांबरोबर भाग घेतला.

इंदिराजींचे व्यक्तिमत्व समानतेत सर्वप्रथम, श्रेष्ठामध्ये सर्वश्रेष्ठ आणि सर्वतऱ्हेने अलौकिक असे होते. राष्ट्राचे ऐक्य व एकात्मता राहावी, जातीय सलोखा व शांतता नांदावी, दुर्बल घटकांचा अभ्यूदय व्हावा यासाठी त्यांनी भगीरथ प्रयत्न केले. तटस्थ आंदोलनाच्या त्या स्फूर्तिदेवता होत्या. निर्भयता आणि लढाऊ वृत्तीच्या तर त्या प्रतीक होत्या.

त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी लवकर भरून येणे कठीण.

इंदिराजींच्या आत्म्यास परमेश्वर चिरशांती देवो.

# इंदिरा प्रियदर्शिनी

**महत्त्वाची सनावली**

| | |
|---|---|
| १९१७ | जन्म ( १९ नोव्हेंबर ) |
| १९२६ | युरोप दौरा ( जवाहरलालजींबरोबर ) |
| १९३० | ' वानरसेना ' स्थापना |
| १९३१ | मोतीलालजींचे निधन ( ६ फेब्रुआरी ) |
| १९३२/३३ | पुण्यात शिक्षण |
| १९३४/३५ | शांतिनिकेतन ( कलकत्ता ) |
| १९३६ | कमलाजींचे निधन ( २८ फेब्रु. ) |
| १९३६/३७ | शिक्षण ( इंग्लंडमध्ये ) |
| १९४१ | भारतात आगमन |
| १९४२ | विवाह ( २६ फेब्रुआरी ) |
| १९४२ | कारावास ( चले जाव चळवळीत भाग ) |
| १९४४ | राजीवजींचा जन्म |
| १९४६ | संजयजींचा जन्म |
| १९४७ | निर्वासित पुनर्वसन कार्य |
| १९४७ | त्रिमूर्तीत निवास (जवाहरलालजींची देखभाल) |
| १९५९ | काँग्रेस अध्यक्ष |
| १९६० | फिरोजजींचे निधन ( ८ सप्टेंबर ) |
| १९६४ | जवाहरलालजींचे निधन ( २७ मे ) |
| १९६४ | शास्त्री मंत्रिमंडळात ' माहिती नभोवाणी ' मंत्री |
| १९६६ | पक्षनेतेपदी निवड ( १९ जाने. ) |
| १९६७ | पक्षनेतेपदी दुसऱ्यांदा निवड |
| १९६९ | बँक राष्ट्रीयीकरण |
| १९७१ | मध्यावधी निवडणुका व पक्षनेत्या. |
| १९७१ | पाकिस्तानचा पराभव, बांगला निर्मिती |
| १९७२ | भारतरत्न ( २६ जाने. ) |
| १९७७ | विरोधी पक्षनेत्या |
| १९८० | नेतेपदी निवड, संजयजींचा अपघाती मृत्यू |
| १९८४ | प्राणघातक हल्ल्यात मृत्यू ( ३१ आक्टो. ) |

# प्रतिज्ञा

भारत मेरा देश है ।
सभी भारतीय मेरे भाई बहन हैं ।
मुझे अपने देश से प्यार है ।
अपने देश की समृद्धि तथा विविधताओं से
विभूषित परंपराओं पर मुझे गर्व है ।
मैं हमेशा प्रयत्न करूँगा कि उन परंपराओं का
सफल अनुयायी बनने की क्षमता मुझे प्राप्त हो ।
मैं अपने मातापिता, गुरुजनों और बडों का
सम्मान करूँगा और हर एक से सौजन्यपूर्ण
व्यवहार करूँगा ।
मैं प्रतिज्ञा करता हूँ कि मैं अपने देश और
देशवासीयों के प्रति निष्ठा रखूँगा ।
उन की भलाई और समृद्धि में ही मेरा सुख
निहित है ।

– जय हिंद –

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र 9686 दिनांक 22/12/58
विषय

BVBK-0401747



# रा. वा. शेवडे गुरुजी

## जीवनपट

**जन्म :** १४, मार्च १९१५

**शिक्षण :** एम्. ए. (१९४४), बी. टी. (१९४३)
मॉन्ट डिप. (१९४३), हिंदी कोविद (१९५०)

**सेवापदे :** मुख्याध्यापक
उषाराजे गर्लस् हायस्कूल, कोल्हापूर
प्राचार्य
ताराराणी अध्यापिका विद्यालय, कोल्हापूर

**सेवाकाल :** विद्यापीठ हायस्कूल, कोल्हापूर : ५ वर्षे
प्रफुल्ल पिक्चर्स, मुंबई : १ वर्ष
ताराराणी विद्यापीठ : २५ वर्षे

**सेवामुक्त :** १४, मार्च १९७३

**छंद :** **कथाकथन** : ( अंदाजे १०० कार्यक्रम )

**बाल कुमार वाङमय लेखन**
१०० कविता, १५ नाट्यप्रवेश, २० चरित्रे, ४ कादंबरिका
३०० कथा इत्यादी ६० पुस्तकांतून प्रसिद्ध.
शासनमान्यता व रसज्ञमान्यता प्राप्त

**निवास :** 'शिवसंस्कार' २२०५, डी, कोल्हापूर